"केसरी-"-"धनुर्धारी-"रचित-

महाराष्ट्रकुटुंबसंग्राह्यपुस्तकावली.

# जवानमर्द ब्राह्मणभाई.

(२ उमदे तुल्मुलख विठ्ठल शिवदेव विंचूरकर.)

जन्म. इ. स. १६९५, वय ७२ वर्षे.

मृत्यु. श्रावण वद्य १ शके १६८९, इ. स. १७६७.

जनार्दन महादेव गुर्जर

ह्यांनीं,

मुंबईंत

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

[illegible] १८९२ इसवी.

[illegible] स्वाधीन ठेविले आहेत.

[illegible] आणे.

M.S.W. 80

# उद्गार.

मनुष्यानें प्रयत्न मात्र केला पाहिजे, ह्मणजे हवी ती गोष्ट साध्य होते, आणखी हिम्मत धरावी ह्मणजे लागतील तीं कामें उरकतां येतात, असें पुष्कळ अनुभवी लोक ह्मणत आले. त्याचें प्रत्यंतर हरहम्मेशा आढळून येतें. आपला देश आणि आपले लोक यांचा कैवार धरावा, आपल्या देशाच्या उपयोगी पडावें, आपण जन्मलों त्याचें सार्थक व्हावें, ही इच्छा ज्याच्या मनांत प्रबळ झाली त्याच्या हातून कांहींना कांहीं तरी काम हें जाहलेंच पाहिजे. असा अनुभव आपणांस पुष्कळ वेळां येतो व आला आहे. आपल्या स्वामीचे व आपल्या देशाचे उपकार मानावेत, आपल्या कुळाचें व आपलें नांव राखावें, आपली व आपल्या लोकांची इभ्रत वाढवावी, आपल्या आंगचें पणी दाखवावें, आपले हाल व आपल्यावरील संकटें दूर करावींत आणि आपण मनुष्यें आहोंत, आपल्या अंगांत कर्तृत्व आहे, आपण केवळ मेंढरें नव्होंत, याची खात्री करावी असे विचार मनांत पुरे बाणले आणि इमान, दृढनिश्चय, ईश्वरावर भरंवसा, स्वहिताचा त्याग, धैर्यावलंबन, कर्तव्याकडेच दृष्टि, प्राण गेला तरी बेहेत्तर, पण सत्पथ सोडावयाचा नाहीं असा निश्चय, अशी सामुग्री जवळ बाळगिली कीं काम फत्ते हें झालेंच. मग तेथें दौलत नको, मोठ्या वशिल्याची गरज नाहीं, लक्ष्मीची कृपा नको कीं कांहीं एक नको. आणखी असें आहे कीं, मनुष्यांतला एखादा गुण असतो तो बहुत वेळां नज़रेस पडत नाहीं, तसाच तो लुप्तप्राय होऊन बसला असतो. त्याला प्रसंग मिळाला कीं तो विद्युल्लतेप्रमाणें चमकूं लागतो. मग त्याचें असह्य तेज सहन होईनासें झाल्याशिवाय राहत नाहीं. जवळ लोहचुंबक आहे;

लोखंडाचा संयोग होईल तर आपला गुण तो दाखवील, नाहीं तर तो लोहचुंबक असें तरी कोणास कळणार आहे ? भयंकर व महान् प्रतापी सिंह, मदोन्मत्त हत्तीची गांठ पडली ह्मणजे त्याचा पराक्रम पाहावा पण तेंच पिंजऱ्यांत कोंडून, व त्याचीं नखें काढून, मेलेल्या मांसावर क्षुधा निवारण करण्याचा वखत, काव्यानें आणि मतलबानें साधून आणल्यावर त्याच्या हातून काम तें काय होणार. त्याची स्थिति मेंढरासारखीच दीनवाणी व्हावयाची. तात्पर्य एवढेंच कीं, आंगचे गुण एकापेक्षां एक अलौकिक दाखवावयाचे तर प्रसंग हवेत व दाखविण्याची ईर्षा हवी व दाखविले तर त्याचें चीज व्हावें असा योगायोग असला पाहिजे तरच त्याचा उपयोग. आमच्या जिवलग व प्राणासारख्या प्यार मायदेशांत असे प्रसंग अनेकांस अनेकवेळां आले; त्यावेळीं त्यांनीं आपल्या करामतीनें साऱ्या दुनयेस थक्क करून तोंडांत बोटें घालावयास लाविलें. त्याच लोकांच्या पोटीं जन्मास आलेल्या लोकांस तूर्त अक्कावाईनें घेरलें आहे. यामुळें आपले पूर्वज कसे होते, त्यांनीं केव्हां कसें व काय केलें याची देखील शुद्ध नाहींशी झाली आहे. ह्मणून त्यांना शुद्धीवर आणावें आणि प्रस्तुतच्या कालमानाप्रमाणें सारासार विचारपूर्वक व पूर्णराज्यनिष्ठेला अगदीं अनुरूप अशा ज्ञानपटांगणांत आपलें कर्तृत्व दाखविण्यास उद्युक्त करावें ह्मणून त्यांच्याच एकेका पूर्वजाची मुलाखत करून देणें जरूर आहे. तो मागला काळ अडाणी व फाजील क्रूरतेचा; त्यावेळीं सदा समशेरीशीं आणि प्राणाशीं गांठ असे. तरी सुद्धां, जणो काय लग्नादि मंगलकार्यच समजून फार जुन्याकाळचे नव्हत पण खुद्द आपले आजे पणजे सुद्धां प्राणावर उदार होऊन व आपलें कर्तृत्व जाणून आपला मान आणि आपला लौकिक राखण्यासाठीं चालून

जात. पानपत कोणीकडे हिंदुस्थानांत, गांठ गिलच्यासारख्या अरबुद जातीशीं, पण आमच्या मायदेशचे शूर बच्चे एकटेदुकटे नव्हे, दोन अडीच लाख लोक खण्खण् समशेरी चमकावीत ईर्षेनें चालून गेले ! पण त्याच देशांत आणि त्याच शूर पठ्यांच्या पोटीं जन्मास आलेल्या कुलांगारांमध्यें, शांततेच्या काळांतील बसल्याजागीं बसून आत्मोन्नतीचा, देशकल्याणाचा, देशबंधूंच्या ऐक्यतेचा विचार करण्यांत आणि विचाराप्रमाणें आचार ठेवण्यांत कसूर व्हावी हें केवढें दुर्दैव ? हा आमचा दैवदुर्विपाक होय. असो. फक्त कपाळावर हात ठेवूनच बसूं नये ह्मणून, एकेका शहाजोग नररत्नाचा प्रकाश आपल्या देशबंधूंपुढें पाडला पाहिजे. त्याप्रमाणें आज "उमदे तुल्मुलुख विठ्ठलराव" यांची मुलाखत करून देऊं.

"धनुर्धारी."

# उमदे तुलमुलुख विठ्ठल शिवदेव विंचूरकर.

मराठी १५

**सासवड** मुक्कामीं दाणीपणाच्या वतनाचा उपभोग करणारा **शिवदेवपंत** ह्मणून एक गरीब ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण होता. त्याच्या पोटीं **विठ्ठलराव** हे जन्मले. ह्यांना दोघे वडील बंधु असत. विठ्ठलराव हे सर्वांत धाकटे. उभयतां वडील बंधु कर्तेसवर्ते झाले. प्रपंचभार हळू हळू त्यांनीं आपल्या शिरीं घेतला. आणि "प्रपंचभर घे शिरीं करि कृपा पिता त्यावरी" या न्यायानें शिवदेवपंतांची आपल्या दोन्ही मुलांवर विशेष प्रीति असे, तितकी किंवा मुळींच विठ्ठलरावावर नव्हती. घरची गरीबी असल्यामुळें विठ्ठलराव सर्वांस जड वाटूं लागला. त्याचें लग्न व्हावयाचें होतें पण तें करण्याची सुद्धां पंचाईत पडली. कारण विठ्ठलराव आयतेंखाऊ, आयदी, त्यांना उद्योग ना धंदा; घरीं गरीबी हात जोडून होतीच. तेव्हां वडील, वडील बंधु वगैरे घरांतलीं सर्व माणसें विठ्ठलरावांस वारंवार बोलूं लागलीं तूं मोठा झालास, तुला किती दिवस आह्मीं पोसावें, आपल्या पोटाची सोय पाहीनास कसा, येथपर्यंत स्पष्ट बोलण्याची मजल येउन ठेपली. एके दिवशीं विठ्ठलराव जेवावयाला बसले आणि त्यांच्या वडिलांनीं त्यांना रागें भरावयास सुरुवात केली; तूं मरतास तरी बरें होतें, खायाला काळ आणि जमिनीला भार होऊन कशाला जगलास वगैरे उद्गार रागाच्या आवेशांत शिवदेवराव बोलले, त्यासरशी विठ्ठलरावाच्या मस्तकांत चक्कन् प्रकाश पडला. त्यांच्या अंगांतील कित्येक अमोलीक व असाधारण गुण स्वस्थ घोरत पडले होते ते खाडकन् जागे जाहले. मस्त-

कावर हाणतांच साप फडा उगारून क्षणमात्र सर्वांस भेदरून सोडतो तसा प्रकार विठ्ठलरावांचा झाला. परमजहाल, लोहबाणापेक्षां तीक्ष्ण वाग्बाण, विठ्ठलरावांच्यानें सोसवले नाहींत; पुढें वाढलेलें अन्न त्यांस गोड लागेना तसेंच अर्धेंमुर्धें जेवण आटोपून विठ्ठलराव उठले; सद्गदित अंत:करणानें आईबापांकडे जाऊन पोटाचा उद्योग पाहण्यास बाहेरमुलुखीं जातों, आज्ञा असावी असें विचारिलें. आईबापेंच तीं त्यांना हें कोठचें सहन व्हावयाला. रागाच्या भरांत आपण बोलून गेलों, त्याचा हा असा परिणाम झाला. याबद्दल त्यांस फार वाईट वाटलें. "बाळा! नको हां रागावूं रहा येथेंच. नाहीं उद्योग केलास तरी चालेल. कोठें जातोस?" असें पाठीवर हात फिरवित विठ्ठलरावाची त्यांनीं पुष्कळ समजूत केली. पण त्याचा उपयोग काय? संतापानें फणफणणाऱ्या त्याच्या मनोवृत्ति कशाला माघार घेताहेत? आई, बाबा, जातोंच मी आतां, नका आग्रह उगाच करूं, नको हें मेलेलें अन्न खावयाला. असेल हिम्मत तर खाऊं मिळवून, नाहीं तर त्यापेक्षां मेलेलें काय वाईट. अशा प्रकारें दीनवाणे उद्गार काढीत अखेर विठ्ठलराव घराबाहेर हे पडलेच. कर्मधर्मसंयोगानें **शाहूमहाराज छत्रपति** यांचे बक्षी व विठ्ठलराव यांची गांठ पडली. विठ्ठलरावांस आपल्या पागेचें काम या बक्ष्यांनीं सांगितलें "आईत खाऊ" विठ्ठलराव एकदांचे पागेस कसे तरी लागले ह्मणावयाचे. पागेंतल्या देखरेखीचें काम करीत असतां शाहूमहाराजांबरोबर शिकारीला जाण्याचा प्रसंग एक दिवशीं विठ्ठलराव यांस आला. बरोबर पुष्कळ सरदार, मानकरी वगैरे होतेच. छत्रपति एका रानडुकराच्या पाठीस लागले, तो मुसांड्या देत पळत सुटला. हातची शिकार जाते अशी सर्वांस भीति पडली. तों इतक्यांत हे "ब्राह्मणभाई" जवळच होते. त्यांच्या पुढून डुकर जाऊं लागला.

छत्रपतीच्या हातची शिकार जाते हें त्यांला कोठलें खपावयाला ? एकदम त्यांनीं घोड्यावरून खालीं उडी टाकिली आणि पळत सुटलेल्या रानडुकराच्या मागल्या तंगड्या आपल्या दोन्ही पायांनीं दाबून धरिल्या व हातांत त्या डुकराचे कान धरून त्याला उभें केलें! पहा कोण भयंकर धाडस हें! इतक्यांत शिकारीचा शोध करीतकरीत शाहूमहाराज आले. आणि पाहतात तों एका ब्राह्मणानें, डुकराच्या तंगड्या पायांत दाबून धरिल्या आहेत आणि कान उपटून त्या प्राण्याची रीगच जिरवीत आहे. तेव्हां हें पाहून ते मोठे थक्क झाले आणि तुह्मी कोण, कोठचे राहणारे, वगैरे प्रश्न महाराजांनीं विठ्ठलरावांस केले. त्यांनीं आपली हकीकत तत्काळ महाराजांस निवेदन केली. तो वखत स्वराज्यांतला. राजे खरे गुणग्राहक, आणि त्यावेळीं अशा कर्तृत्वशक्तीचीच चहा होती. मग काय विचरायाचें आहे? तावडतोब महाराजांनीं विठ्ठलरावजींची त्यांच्या गुणानुरूप संभावना केली ह्मणजे विठ्ठलरावजींस आपल्या तैनातींत घेतलें. प्रथमतः विठ्ठलरावांस बारगिरी सांगितली. झालें; तेथून लागला या ब्राह्मणभाईच्या शौर्यदिनकराचा उदय व्हावयाला! आईबापांस जड झालेला हा ब्राह्मण हो. पहा त्यानें काय काय कामें कशीं बजाविलीं आणि लक्ष्मीला कशी दासी करून सोडिली ती ?

शाहूमहाराजांच्या नजरेसमोर विठ्ठलराव होते आणि राज्यकारस्थानें, मोहिमा वगैरे तमाम घडामोडी त्यांच्या नजरेसमोर चालत, त्यामुळें सर्व प्रकारचें त्यावेळचें शिक्षण अनायासें विठ्ठलरावांस मिळूं लागलें. विठ्ठलराव शूर व हिम्मतवान् शिपाईगडी अशी शाहूमहाराजांची दिवसेंदिवस खात्री होत चालली. राजाची कृपा संपादण्यांत विठ्ठलरावांनीं आपली करामत दाखविण्याला कमी केलें नाहीं. इतक्यांत, जंजिऱ्याच्या शिद्यावर

चिमाजीआपा (बाजीरावाचे धाकटे बंधु) यांस शाहूमहाराजांनीं पाठविलें. शिद्दी फार प्रबळ झाला

इ० स० १७२०.

होता; त्याची खोडकी मोडावयाची होती. त्याचें राज्य कोंकणांत, समुद्रकिनाऱ्यावर. मुलुख डोंगराळ. चिमाजीआपांबरोबर विठ्ठलशिवदेवही गेले. लढाईचा हा त्यांना पहिला प्रसंग. गांठ तर असल्या भयंकर व प्रबळ शत्रूशीं. पण नाहीं, त्या ब्राह्मणाचें क्षात्रतेज कांहीं विलक्षणच, त्याची समशेर सदा फत्ते असावयाचीच. छाती निधडी; स्वामिसेवेला चोर नव्हे. केव्हां शिद्याची गांठ पडेल आणि कसा नरडीचा घोट घेईन ह्मणून हा वीरपठ्या टपून बसलेला. शिद्याच्या छावणी-जवळ चिमाजीआपा जाऊन पोंचले मात्र, तों लागला हा ब्राह्मण समशेर चमकावयाला ! नशीबाचा जोर कां ह्मणावें ? विठ्ठलरावांचें तेजच असाधारण. त्यांची छाती जशी काय सिंहाची आणि रणसंग्राम जणों काय पोरखेळ, असें त्यांला पहिल्या खेपेलाच वाटलें. लढाईचें तोंड लागलें आहे, उभय सैन्यें शस्त्रास्त्रें सांवरून आपलें युद्धकौशल्य दाखवीत आहेत, तों अकस्मात् शिद्दीसाद, आपल्या सैन्याला ईर्षा देण्यासाठीं, विठ्ठलराव उभे होते तेथून घोडा फेंकीत चालला होता. तें या ब्राह्मणानें पाहिलें मात्र, कीं उचलली समशेर आणि हाणली त्याच्या डोक्यावर. त्यासरशी बिचारा शिद्दी धाडकन् भूमीवर पडला ! मग त्याच्या सैन्याचा दम तो किती वेळ निघणार ? चिमाजीआपा होतेच. त्यांनीं शिद्दीची ही अवस्था पाहिली आणि लगेच लगट करीत धांवून आले. शिद्दीच्या सैन्यांत, ना कोणी धनी ना गोसावी, अशी स्थिति झालेली, तेव्हां त्याचा पुरा मोड झाला हें कशाला सांगावें आणि सांगण्यांत अर्थ तरी कोणता ? शिद्दी पडतांच विठ्ठलरावांनीं लूट चालविली. यथेच्छ लूट मिळवून आपल्या गो-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

टाकडे मग ही स्वारी परतली, त्या वेळचा त्यांचा आनंद काय सांगावा? अगदीं पहिला प्रसंग आणि अशी ही फत्ते! खाशा शत्रूचें शीर स्वत: उडविलेलें. मग त्या आनंदास पारावार का असावयाचा आहे? चिमाजीआपा अगदीं खुषालले. आजची लढाई विठ्ठलरावांनीं मारिली, सरकारांनीं त्यांच्या नौकरीबद्दल त्यांला इनाम द्यावें ह्मणून त्यांनीं सातार्‍यास पत्र रवाना केलें. आणि त्याप्रमाणें विठ्ठलरावांची वाहवा दरबारांत बहुत जाहली. आमचे त्या वेळचे राजे सुधारलेले नव्हते. अशा या बहादुरीबद्दल किताबांवर बोळवण करण्याची त्यांच्यांत अकलच नव्हती. एकादा बिल्ला आणि तो टांगण्याला सुंदरशी रश्शी नजर केली ह्मणजे काम आटोपलें. तें सोडून जाहगीर दे, पालखी पाठीव, अबदागिरीचा मान सांगा असा हा त्यांचा प्रकार! तेव्हां त्या अडाणी काळच्या रीतीप्रमाणें विठ्ठलरावाची शाहूमहाराजांनीं संभावना केली! विठ्ठलराव शूरशिपाई असें सर्व ह्मणूं लागले. यावेळीं **बाळाजी विश्वनाथा**कडे शाहूमहाराजांनीं पेशवाई सांगितली होती. त्यांना पुष्कळ मोहिमा वगैरे करावयाच्या असत. त्यांच्या मदतीस शूर शिपाई असतील तितके बरे ह्मणून विठ्ठलरावांस पेशव्यांकडे लावून दिलें. कारण, सातार्‍याच्या बैठ्या कामापेक्षां रणसंग्रामाचीं कामें यांच्या हातून चांगलीं पार पडतील अशी सर्वांची खात्री होऊन चुकली. आणि तसें झालें तेंच विठ्ठलरावांच्या पथ्यावर पडलें. इतक्यांत दुर्दैवानें बाळाजी विश्वनाथ वारले! तेव्हां त्यांचें पेशवाईपद **बाजीराव** नामक त्यांच्या पुत्रास मिळालें. यामुळें अर्थात् बाजीरावाजवळच विठ्ठलरावास रहावें लागलें, बाजीराव ह्मणजे जसा काय रणनवरा; मोहिमा, लढाया, हल्ले, हे त्याचे रोजचे व्यवसाय. विठ्ठलरावांस ही संधि मोठ्या पथ्यावर पडली!

बाजीरावाची मुलुखगेरी माळवा प्रांतावर झाली. दाउद-खान ह्मणून माळव्याच्या सुभेदाराचा एक सरदार होता. त्यानें मराठ्यांस ब्ऱ्हाणपुरानजीक अडविलें.

इ० स० १७२३.

उभय सैन्यांतले लोक जिवावर उदार होऊन लढत. मराठ्यांचा जय व्हावा अशांतला कांहीं प्रकार नव्हता. मुसलमान फार प्रबळ असून त्यांना पाठपुरावा चांगला होत असे. परंतु मराठ्यांस जिवाची पर्वा नव्हती. हरउपाय करून जय मिळविल्याशिवाय परतावयाचें नाहीं, हा त्यांचा कृतनिश्चय. यामुळें माघार न घेतां मराठ्यांनीं दाउदखानाशीं मोठ्या निकरानें झुंज चालविलें. विठ्ठलरावांची सलाबत चांगली. समशेर फत्ते. दाउदखानाची गर्दन विठ्ठलरावांनींच उडविली. बाजीरावानें पाहिलें कीं, हा शिपाई मातबर दिसतो; त्याला चढवून सरदार करावें. त्याप्रमाणें लगेच एका पथकाचा अधिकारी नेमून अघाडीची शिपाईगिरी करीत जा असें बाजीरावानें विठ्ठलरावांस फर्माविलें.

याप्रमाणें माळवाप्रांत सर करण्याच्या वगैरे सर्व मोहिमांत विठ्ठलराव प्रमुखत्वेंकरून असत. एखाद्याच्या दिमतीखालीं काम करावयाचें ह्मणजे आपल्या यशाचे वांटेकरी दुसऱ्यास होऊं देणें होय. आणि चरित्र लिहिणारासही मोठी अडचण पडते ती ही कीं, यांत यश द्यावें तरी कोणास? विठ्ठलरावांनीं इ० स० १७३० सालीं माळव्याचा सुभेदार यास ठार करून चौथाई व सरदेशमुखी घेतली. ही मोहीम चिमाजीआपानें केली होती. बरोबर विठ्ठलराव होते. त्यांनीं खाशा सुभेदारांस गांठून त्याला कंठस्नान घातलें. मोहीम फत्ते झाली. चिमाजीआपांनींही मर्दपणाची शर्थ केली. आतां या मोहिमेची फत्ते द्यावी कोणाच्या वांट्यास? अर्थात् चिमाजीच्या. पण विठ्ठलरावांनीं खानबाहा-

दुरास आपल्या समशेरीनें ठार केलें, त्याचें हें चरित्र आहे ह्मणून चरित्रलेखकास वाटतें कीं, हें सगळें यश विठ्ठलरावांकडे. त्याचप्रमाणें वसईचा किल्ला सर केला तो प्रसंग. **मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, विठ्ठल शिवदेव, आंग्रे, मानकर** हे इतके सरदार चिमाजीआपांबरोबर होते. **वसईची मोहीम** ह्मणजे मराठ्यांच्या अपूर्व मर्दुमकीचा सर्वोत्कृष्ट मासला. खरोखर या वसईच्या मोहिमेंत आपलें भयंकर क्षात्रतेज प्रकट करून मराठ्यांनीं फिरंग्यांचे डोळेच पण दिपवून सोडिले. किल्ला समुद्रांत, गांठ युरोपच्या पोर्तुगीज लोकांशीं. त्यांचा दारूगोळा, त्यांच्या कवायती ह्मणजे काय विचारावयाच्या आहेत? ते पूर्ण सुधारलेले, आपल्या देशबंधूंस धर्मभ्रष्ट करितात कीं ह्मणून मराठ्यांनीं त्यांची कुरापत काढलेली, गांठ तों अशा प्रबळ शत्रूशीं. किल्ला हस्तगत होत नाहीं तर मला तोफेच्या तोंडीं बांधून माझें शिर तरी किल्यांत जाऊन पडे असें करा, हा निर्धार चिमाजीआपाचा. ग्रांड डफ ह्मणतात पांच हजार मराठ्यांचीं शिरकमलें वसईच्या किल्यावर वाहिलीं गेलीं. पण मराठे ह्मणजे मोठे यशस्वी. फत्ते केल्याशिवाय ते सोडावयाचे नाहींत. सरशेवटीं वसई ही मराठ्यांनीं सर केलीच आणि तेथील फिरंगी सरदाराला दांतीं तृण धरून शरण यावयास लाविलें. या मोहिमेंत विठ्ठल शिवदेव होते पण त्यांच्या वांट्यास अमुकच यश सांगणाऱ्यानें सांगावें कसें? पण निदान एवढी गोष्ट तरी निश्चित कीं, वसई सर होतांच चिमाजीआपा व इतर सरदार परतले. आणि कोंकणप्रांतीं पेशव्यांचा पूर्ण अम्मल बसविण्याचें काम मात्र एकट्या विठ्ठलरावांकडे होतें. समुद्रकिनाऱ्यावर आणि पोर्तुगीजांसारख्या लोंचट, नौकागमनांत आणि गोलंदाजींत पूर्ण पटाईत अशा सुधारलेल्या कवाईतीच्या लोकांशीं झुंजा देत देत विठ्ठलरावानें **कल्याण, साष्टी** इत्यादि

दरोबस्त ठाणीं सर केलीं. त्यानें पेशव्यांचा अधिकार सर्वत्र सारखा बसविला. तो कोठें ह्मणून हार गेला नाहीं.

पुढें बाजीरावांनीं आपली मोहिम दिल्लीकडे केली. त्या प्रसंगीं सबंध सत्तावीस दिवस घोड्यावरलें जीन ह्मणून बाजीरावानें उतरविलें नाहीं. साताऱ्याहून निघाले ते सत्ताविसाव्या दिवशीं **धन्नापन्ना** ह्मणून हिंदुस्थानांत शहर आहे तेथें येऊन उतरले. बरोबर विठ्ठल शिवदेव होते. त्यांचाही क्रम तोच ह्मणजे घोड्यावरली मांड सत्तावीस अहोरात्र कांहीं हलविली ह्मणून नाहीं. दिल्लीची मोहीम, पुढें निजामाची कटकट वगैरेंत सर्व फत्तेच झालीं. त्यावेळीं विठ्ठलराव समागमें होते. त्यांच्या वांट्यासही यश हें आलेंच पाहिजे. तें अमुकच असें मात्र सांगतां येत नाहीं. असो. पुढें महाराष्ट्रियांच्या कम नशीबानें बाजीरावासारखा रणधुरंधर व अपूर्व योद्धा लवकरच ह्या लोकींचा सर्व कारभार टाकून स्वर्गलोकीं चालता झाला. त्यामुळें ह्या आपल्या देशांत मोठा हाहा:कार कोसळला तर त्यांत नवल तें कोणतें?

इ० स० १७४०

इ० स० १७४०. एप्रेल २८.

बाजीरावानंतर पेशवाईपद **नाना साहेबांस** मिळालें. विठ्ठल शिवदेव खासे मर्द व शूर शिपाई आहेत, असा लौकिक सर्वतोमुखीं जाहलेला. त्यामुळें नाना साहेबांची विठ्ठलरावांवर मेहरनजर होती. बंगाल्यांत **नागपूरकर भोंसल्यांनीं** मोठा कहर कोसळून सोडला; ते कोणास ह्मणून चैन पडूं देईनात. बाजीरावाच्या पश्चात् पेशवाईपद त्यांच्या मुलास न देतां, बारामतीकर यांस द्यावें, असा घांट नागपूरकरांनीं घातला होता. त्यामुळें पेशव्यांचे मनांत नागपूरकरांविषयीं वैषम्य सांचलेलें असे. तों इतक्यांत **अल्लीमर्दीखान** नामक दिल्लीकरांच्या सुभेदारानें पेशव्यांस पत्र लिहिलें कीं,

तुमच्या मराठ्यांनीं, आह्मांस अगदीं त्राही त्राही करून एकसारखी त्यांनीं इकडे लूट चालविली आहे. पुढें काय करावें हें आह्मांस सुचेना. तुह्मी आह्मांस त्यांच्या त्रासांतून सोडवा ह्मणजे काय मागाल तें देऊं. माळवा प्रांत हवालीं करितों, चौथाई बाबही पत्करितों, पण सहाय्य करा, अंतर देऊं नका. हें नानासाहेबानें कबूल केलें. नागपूरकरांची खोड मोडण्याची संधीही अनयासेंच चांगली आली. विठ्ठल शिवदेव यांस बरोबर घेऊन नानासाहेब हिंदुस्थानांत मोहिमेस गेले. भोंसल्याच्या सैन्याचा मोड झाला. ते नागपुरास परतले. नानासाहेबांची फत्ते झाली. माळवाप्रांत, चौथाई बाब मोंगल सुभेदारानें पेशव्यास बहाल केली. या प्रसंगीं विठ्ठलरावजींनीं आपलें युद्धकौशल्य मोठें नामी गाजविलें तें पाहून नानासाहेब खुष झाले.

इ० स० १७४३.

त्यांनीं माळवा प्रांतांतल्या **अकरा महालांची सनद** विठ्ठलरावांस तेथल्यातेथें करून दिली! उद्योगधंदा करीत नाहींस, तुला अक्कल नाहीं, तुझा उपयोग काय? तुला कशाकरितां पोसावें? ह्मणून आईबाप ज्यास रोज बोलत, तो मुलगाच बरें हा विठ्ठलराव! घरीं, मेलास तरी पुरवतें ह्मणवून घेणारा, सातान्यास बक्ष्यांच्या पागेंत घोडीं कशीं काय आहेत हें काम फक्त पोटावारी करणारा विठ्ठलराव, नानासाहेब पेशव्यांशीं आतां कानगोष्टी आणि मसलती करूं लागला! एवढ्यावर संपलें असें नाहीं; विठ्ठलरावांच्या यशोदिनकराचा हा नुक्ता प्रातःकाल होय. मध्यान्हाकडे पाहून डोळे दिपवून घेण्याचें अद्याप पुढेंच आहे. मनुष्यानें मनांत आणलें आणि त्याप्रमाणें प्रयत्न करूं लागलें तर काय होणार नाहीं?

विंचूरच्या आसपास **नंदाजी** नामक एका बंडखोरानें पेशवे सरकाराविरुद्ध मोठें बंड उभारिलें. तो मोठा प्रबळ असे; जवळ

मोंगलाई मुलूख. त्यांचें, आंतून त्याला मुबलक सहाय्य. पेशव्यांस पाहूं न शकणारे घरभेदी सरदार कांहीं होते, त्यांचीही त्याला अनुकूलता असे, त्यामुळें लौकरच त्यांचें पारिपत्य करणें भाग पडलें. विठ्ठलरावांची या कामीं नेमणूक झाली. नंदाजी तो यःकश्चित् बंडखोर, त्याचा विठ्ठलरावांपुढें कितीसा टिकाव लागणार? पहिल्या गांठीसरशीच विठ्ठलरावांनीं नंदोजीबुवास कैलास दाखविला. त्याच्या सैन्याची दाणादाण केली, आणि आपला अंमल तेथें बसविला. पेशव्यांनीं, विठ्ठलरावांस **विंचूर परगणा** बहाल करून त्या गांवच्या इनाम सनदा विठ्ठलरावांकडे तावडतोब रवाना केल्या; तेव्हांपासून आपलें मुख्य ठाणें विठ्ठलरावांनीं विंचुरास केलें आणि ह्मणूनच त्यांस पुढें विंचूरकर असें ह्मणूं लागले.

इ० स० १७४४.

नानासाहेबांनीं कर्नाटकांत मुलुखगिरी केली त्यावेळीं विठ्ठलराव बरोबर होते. सदाशिवरावभाऊ, मेहेंदळे, पटवर्धन इत्यादि मंडळही समागमें असे; त्यामुळें विठ्ठलरावांच्या वांट्यास अमूकच यश, असें ह्मणून निश्चित सांगतां येत नाहीं. **हानिहोन्नूरचा** किल्ला मात्र एकट्या विठ्ठलरावांनीं सर केला. त्यावेळीं त्यांचें तें शौर्य पाहून नानासाहेब फारच खुष झाले. आणखी अशा सरदारास स्वतंत्र एखादी मोहीम सांगितली तर मोठी बहार होईल, असें त्यांच्या मनानें घेतलें. **राघोबादादा** नानासाहेबांचा भाऊ. त्याच्या अंगीं कांहीं विलक्षण पाणी असे. त्याची आणि विठ्ठलरावांची जोडी केली तर ते प्रत्यक्ष कृतांत काळाला दांतीं तृण धरावयास लावितील; कदापि सोडावयाचे नाहींत, असें सर्वांस वाटत असे. त्याचा अनुभव तरी पाहवा ह्मणून सर्वांनीं निश्चय केला. विठ्ठलरावांस सैन्याधिपत्य, व

इ० स० १७५२.

**सखारामबापूंस** मुख्य कारभार सांगून राघोबाच्या स्वाधीन त्या उभयतांस केलें, आणि हिंदुस्थान काबीज करा ह्मणून सांगितलें. राघोबा ह्मणजे खरोखर खमक्या लढवय्या; त्याच्या शौर्याला उपमा अशी नाहींच. तीस कोसांची मजल मारील तेव्हां रिकीबींतून पाय खालीं काढावयाचा असा त्याचा नेम. ह्मणून त्याचे शिपाई मोठ्या प्रेमानें **राघोबादादा भरारी** असें त्यांस ह्मणत. सखारामबापू ह्मणजे जसा काय बुद्धीचा सागर. साडेतीन शाहणे ह्मणून पेशवाईत प्रख्यात असत. नाना फडणीसा सारखा राज्यकार्यधुरंधर मुत्सद्दी इंग्रजांस सुद्धां "खडे चारणारा" अर्धा शाहणा आणि हा बापू सबंध शाहणा. उरले गृहस्थ विठ्ठलराव. त्यांचा हिय्या, त्यांचें शौर्य आणि त्यांची स्वामिसेवापरायणता व घेतल्या कामांत प्राण गेला तरी पतकरेल एखादे वेळ, पण माघार ह्मणून घ्यावयाचा नाहीं, हा बाणा. इत्यादिकांसंबंधानें जास्त लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हें त्यांचें चरित्र सबंध वाचून नंतर वाचकांनींच सांगावें कीं हा बहाद्दर कसला शौर्यशाली, कोण निधड्या छातीचा, किती स्वामिसेवापरायण आणि कसा भाग्यवान्, बाणेदार, नररत्न, नरकोहिनूर, होता तो ? असे तीन प्रकारचे तीन बाणेदार पुरुषश्रेष्ठ, काळाप्रमाणें चवताळून हिंदुस्थानावर चालून जाण्यास निघाले !

पहिला रोख गुजराथेवर होता. **उरपाड** महाल एकट्या विठ्ठलरावांनीं सर केला. तो इनामदाखल वहिवाटींत घ्या असें राघोबानें त्यांस सांगितलें. **सुरत शहर** पहिल्या झटक्यासरशीं सर केलें. दुसरें महत्वाचें ठिकाण **अमदाबाद** शहर, ती गुजराथ प्रांताची राजधानी. तेथें मोंगलांनीं फारच मोठा बंदोबस्त ठेविला होता. त्यावेळीं नानासाहेब पुण्यास असत. हे तिघे कसा काय पराक्रम गाजवितात याची त्यांना शंका फार होती. प-

हिला प्रसंग गुजराथेंतला. तेव्हां न जाणो कच खातील ह्मणून राघोबाच्या कुमकेस जावें असें **दत्ताजीशिंद्यास** पुण्याहून पत्र गेलें. आपणांस अमदाबाद किल्ला घ्यावयाचा आहे. शिंद्याचें सैन्य येऊन मिळालें आणि मग किल्ला सर झाला तर त्यांत आपला लौकिक फारसा होणार नाहीं. शिंदे येण्यापूर्वीच आपण तो किल्ला व तें शहर हस्तगत करून घ्यावें हें उत्तम; असें विठ्ठलरावांच्या मनानें घेतलें. राघोबासही हें ह्मणणें पसंत होतें. तेव्हां मोठ्या ईर्षेनें विठ्ठलराव आणि **नारोशंकर**[१] या उभयतांनीं आपापल्या फौजा सज्ज करून मोठ्या आवेशानें अमदाबादच्या किल्ल्यावर तुटून पडण्याचा निश्चय केला. मोंगलाचा सुभेदार **जवानमर्दखान;** नांवाप्रमाणेंच तो कृतीनेंही होता. पण त्याचें शौर्य या दोघां ब्राह्मणवीरांपुढें लटपटूं लागलें. किल्ला विठ्ठलरावांनीं सर केला. पेशव्यांचें निशाण किल्ल्यावर लागलें फडकावयाला. तेव्हां शरण येऊन आपला बचाव करावा या हेतूनें तहाचें बोलणें **जवानमर्दखानानें** राघोबाशीं लाविलें. राघोबा जात्या दिलदार मनाचा. त्यानें तुला शाबूत राखतों, मात्र अमदाबाद शहर व किल्ला तेवढा मिळावयाचा नाहीं, तो माझ्या सरदारांनीं फार शौर्यानें आणि जिवाची पर्वा कशी ती मुळीं न बाळगतां; केवळ ईर्षेनें सर केला आहे, असें सांगितलें. तें जवानमर्दखानानें मोठ्या आनंदानें कबूल केलें! अशा प्रकारें प्रारंभीं फत्ते झाली. हा एक मोठा शुभशकुनच समजून बेलाशक पुढें चला, मोहिमा फत्ते करा, असें पुण्याहून लिहून आलें. त्याप्रमाणें तिकडील प्रांतांत हे त्रिवर्ग घुसले. अजमीर वगैरे प्रांतांत आपल्या बाबी लागू करीत **कुंभेरीवर** आले. तेथील **राजा जाट;** त्यानें खंडणी देण्याचें कबूल केलें पण रकम राघोबा ह्मणे तितकी

---

१ हे विठ्ठलरावाचेच भाऊबंद, चुलत चुलत बंधु. सास्वडचेच राहणार.

तो देईना. दोघांचे चार हात झाले, आणि अखेर समेट होऊन या वीरांनीं तेथून पुढें आपला मोर्चा वळविला. या प्रसंगीं होळकराचा मुलगा रणांगणांत पडला. शिंदे रजपुतांकडे गेले आणि राघोबा दिल्लीवर निघाले. इतक्यांत विठ्ठलरावांच्या कुटुंबास देवाज्ञा झाली. त्यामुळें त्यांस मागें राहावें लागलें. आपली फौज पुढें रवाना करून सड्या स्वारीनिशीं विठ्ठलराव तेथेंच कुंभेरीच्या आसपास होते. त्यांचें दुसरें लग्न तेथेंच झालें. यांच्या पहिल्या लग्नाची, त्यांच्या भावाला, कोण पंचाईत पडली होती! पण आतां कांहीं ती काळजी उरली नाहीं. हें कशाला सांगावयाला हवें? असो विठ्ठलराव अशा प्रकारें इकडे गुंतून राहिले होते. त्यांच्या बरोबर पांचपन्नास स्वार असत. मराठ्यांच्या मामुल वहिवाटीप्रमाणें ते आपली कही उकळीत सुटले. कही ह्मणजे आपल्या घोड्यास वैरण दाणा लागेल तो पदरच्या पैशांतून न घेतां आसपासच्या राज्यांतून मिळवावयाचा, असा सांप्रदाय होता. त्याप्रमाणें जाटाच्या मुलुखांत आपली कही विठ्ठलरावांच्या स्वारांनीं घेतली. तें करणें जाटास आवडलें नाहीं. त्यानें विठ्ठलरावांच्या स्वारांस कैद केलें. कित्येकांनीं चार हात करून धारातीर्थीच्या कंठस्नानाची पर्वणी साधून घेतली. हें वर्तमान विठ्ठलरावांस कळतांच त्यांनीं आपला वकील जाटाकडे पाठविला. जाटाचा दिवाण **रूपराम** कोरड्या दिमाखाचा आणि वाचाळ फार असे, त्यानें विठ्ठलरावांची बरीच निर्भर्त्सना केली. एवढेंच नव्हे, तर हे ब्राह्मण, यांना कशाला इतका दिमाख, लढायाचें यांचें काम नव्हे, मुकाट्यानें क्षमा मागा ह्मणावें ह्मणजे स्वार सोडून देतों. अशी बडबड दिवाणानें त्या वकीलापुढें केली. ती ऐकून घेतल्यानंतर तो वकील निमूटपणें परत आला. तें सर्व भाषण ऐकून विठ्ठलराव संतापले. “शरण या आणि ब्राह्मणाचें काम नव्हे.”

हीं वाक्यें त्यांस फारच असह्य वाटलीं. त्याचा सूड घेण्याचा निश्चय कायम करून आपल्या सैन्यास परत बोलाविलें आणि जाटाच्या किल्ल्यावर शह दिला. तीन महिने वेढा होता पण उपयोग कांहीं होईना. कुंभेरीचा किल्ला, जाटाचें सैन्य, त्यांपुढें एकट्या विठ्ठलरावांचा परिणाम लागावा तरी कसा ? इतक्यांत राघोबाकडून पत्र आलें कीं "जाटाबरोबर[१] लढाई सुरू करण्यास आज्ञा घेतली नाहीं व किल्ला कोणेप्रकारचा याचा विचार मनांत न आणतां एकदम लढाई चालू केली. आतां या युद्धास जो खर्च येईल तो तुह्मांस सरकारांतून मिळणें नाहीं व शेवटीं अपयश येईल त्याबद्दल तुह्मांपासून सरकार सक्तीनें जाब घेईल." तेव्हां त्या बिचाऱ्या विठ्ठलरावांच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना करावी.

सहाय्य मिळण्याची आशा तर नाहींच, पण उलट इतराजी. तेव्हां फत्ते मिळवावी एक किंवा मालकास तोंड न दाखवितां लढाईत पडावें हें दुसरें, असें त्यांस वाटलें. आज काय होईल तें होवो. मारणें किंवा मरणें याचा आज निकाल. असें ठरवून विठ्ठलरावांनीं मोठ्या निकराचा हल्ला कुंभेरीवर केला. **महादाजी शितोळे, यमाजी रबळे** हे विठ्ठलरावांच्या कलिजाचे शिपाई. त्यांस आपला निश्चय त्यांनीं कळविला, आणि जिवाची परवा न करितां ते कुंभेरीवर तुटून पडले. पहिल्या झटक्यासरशीं विठ्ठलरावांचा हल्ला जाटानें फिरविला. मागें पाय सैन्यानें घेतला हें पाहतांच विठ्ठलरावांच्या त्वेषानें उचल घेतली. तेव्हां विठ्ठलराव दांत ओंठ चावीत समशेर खेंचून जाटावर चालून गेले. त्यांच्या कलिजाचे शिपाईही बरोबर होते. जाट खासा उभा होता तेथपर्यंत विठ्ठलराव व निवडक सरदार चालून गेले. त्यांच्या

---

१ विठ्ठल शिवदेव यांचे घराण्याचा इतिहास.

समशेरीनें कितीजणांच्या रक्ताचें प्राशन केलें याचा सुमार नाहीं. इतक्यांत स्वतः विठ्ठलरावाला तहान लागली, घसा कोरडा पडला. **मोतीराम** ह्मणून कनोजा ब्राह्मण घोड्यावर पाण्याच्या झाऱ्या घेऊन जवळच होता. त्याच्या जवळचें पाणी विठ्ठलराव पिणार तों इतक्यांत महादाजी शितोळ्यानें खाशा जाटास घोड्यावरून खालीं पाडलें. हें पाहतांच पाण्यानें तहान भागविण्याचें सोडून विठ्ठलराव जाटाकडे धांवले. घोड्यावरून तो खालीं पडला होताच, त्याच्या छातीवर पाय देऊन समशेरीनें त्या जाट राजाचें विठ्ठलरावांनीं शिर उडविलें ! तेव्हां लगेच बाकीच्या लोकांनीं उरलेल्या सैन्याचा मोड हां हां ह्मणतां केला ! सायंकाळचा सुमार. प्रतिज्ञा केलेली शेवटास गेली ह्मणून जयोत्सवानें विठ्ठलराव आपल्या डेऱ्याकडे जावयास निघाले. **राजा गिरधर** हा जाटाचा मुलगा विठ्ठलरावांस शरण आला. त्याला आश्वासन देऊन वाचाळ प्रधानास बोलावूं पाठविलें, आणि तो येतांच, बोला दिवाणजी, ब्राह्मण लढाईच्या कामीं कसे काय आहेत ते ? असा विठ्ठलरावांनीं प्रश्न केला. विठ्ठलरावांनीं आपणांस हवा तो मुलूख देशव्यांचे नांवें करून घेतला आणि फत्ते झाली त्या ठिकाणीं मारुतीचें एक देवालय बांधिलें व **फत्त्यामारुती** असें त्याचें नांव ठेवून विठ्ठलराव पुढें राघोबाच्या मुलाखतीस चालते झाले. राघोबानें या वेळीं पंजाबपर्यंत सगळा मुलूख सर केला. विठ्ठलराव त्या मोहिमेंत असतच. ती मोहीम फत्ते करून उभयतां राघोबा व विठ्ठलराव दक्षिणेंत परतले. पुण्यास आल्यावर ग्वाल्हेरीचा वगैरे मुलूख स्वामीच्या राज्यास जोडिला. त्या कामांत बारा लाख कर्ज झालें तें मिळावें अशी **सदाशिवरावभाऊपुढें** विठ्ठलरावांनीं गोष्ट काढिली. "ग्वाल्हेरीची मसलत कोणाच्या सांगण्यावरून केली ? आणि कर्ज काढून मुलख-

गेरी करण्यांत अर्थ तो कोणता" असा भाऊचा जवाब ऐकून विठ्ठलरावांस फार वाईट वाटलें. पण नानासाहेबांस, विठ्ठलरावाची चांगली माहिती होती. त्यांनीं त्यांस एकीकडे बोलावून सांगितलें; " विठ्ठलराव, फिकीर करूं नका, तें देणें फडशा करून टाकूं. "

यानंतर कर्नाटकची मोहीम[1] निघाली. त्यांतही हे होतेच. प्रथमचा हल्ला सावनुरावर होता. निजाम, कुमकेस येणार त्याच्या पूर्वी सावनूर सर व्हावें, असा पेशव्यांचा मानस, तेव्हां, तें काम **मल्हारराव होळकर** व **विठ्ठल शिवदेव** यांस सांगितलें "अस्तमानपर्यंत सावनूर सर करीन, नाहीं तर रणांत पडून स्वर्गास जाईन.[2]" ही विठ्ठलरावांची प्रतिज्ञा, पशवे नानासाहेब यांजपुढें झाली. त्याप्रमाणें मोठ्या आवेशानें विठ्ठलराव समशेर चमकावीत चालले. उजव्या खांद्यावर मोठी जखमही झाली, आणि अखेर फत्तेही विठ्ठलरावजींनीं मिळविली. तेव्हां पेशवे बहुत खुषालले त्यांनीं विठ्ठलरावांस जाहगीर बक्षीस दिली.

इ० स० १७५५.

राघोबाची विठ्ठलरावांवर इतराजी होती ती नाहींशी होऊन हिंदुस्थानावर दुसऱ्यानें स्वारी करण्याचा राघोबाचा मनसुबा ठरला. तेव्हां, तुह्मीं बरोबर चला, असा विठ्ठलरावांस त्यांचा आग्रह पडला. त्यांनीं मान्य केलें आणि माळवा प्रांतांतून दिल्लीकडे राघोबा, मल्हारराव, विठ्ठल शिवदेव आणि सखारामबापू असे मिळून गेले.

आमच्या जिवलग मायदेशांत त्यावेळीं सर्वांस असेंच वाटत होतें कीं, कसेंही करून **हिंदुपदपातशाही** सर्व देशभर स्थापावी, आपला वचक, झाडून सर्व देशावर बसवावा, आपल्या शौर्यानें सर्वांस माना खालीं घालून बसावयास लावावें, आपलें

---

१ या मोहिमेचें कारण मराठ्यांच्या मर्दुमकी भाग २ यांत पहावें.

२ विंचूरकर घराण्याचा इतिहास.

नांव ऐकतांच सर्वांस थरकांप सुटावा, आपण, आपला देश, आपले लोक यांचा दबदबा सर्वत्र सारखा राहावा. आणि असें त्यावेळेस वाटत होतें ह्मणून, आपली, आपल्या प्राणाची किंवा कशाची त्यांना पर्वा ह्मणून वाटत नसे. चार दिशा चार सिंहांनीं आक्रमिलेल्या. दक्षिणेंत कर्नाटकाच्या बाजूला पटवर्धन, रास्ते, पेठे; उत्तरेस हिंदुस्थानांत शिंदे, होळकर, विंचूरकर, बुंदेले; आंग्रे, धुळप पश्चिमेस; कोंकणांत आणि पूर्वेस खासा स्वारी पेशवे; अशी जणों काय राखण ठेवलेली होती. कोठें कोणी हूं कां चूं करण्याची फुरसत कीं, हे चालले चवताळून अंगावर. आपला देश आणि आपले लोक हें काय तें त्यांस माहीत. आणखी आपलें व आपल्या देशाचें नांव राखण्यांत स्वतःच्या दौलतीची, आप्त इष्टांची, किंवा खुद्द आपल्या प्राणांची देखील त्यांस पर्वा नसे. युद्धप्रसंग ह्मणजे जसा काय एखादा सोहळा; भाऊ, मुलें, सोयरेधायरे घेऊन आणि तेही अगदीं आनंदानें, जशी काय मरणाची आणि संकटाची वार्ताच मनीं नाहीं, अशा थाटनें चालून जात. यावरून एवढें खचित दिसतें कीं प्राणापेक्षां लौकिकाची, कीर्तीची आणि नांव राखण्याची त्यांस फार चाड होती. प्राण गेला तरी बेहत्तर, पण आपल्या किंवा आपल्या देशाच्या नांवाला काळोखी लागतां कामा नये. हा असा त्यांचा विलक्षण बाणा होता; पण आतांच काय झालें आहे कोण जाणे. त्याच आमच्या मायदेशांत हल्लीं कोण निंद्य अभिमानशून्यता, किती निर्लज्ज अजागळपणा आणि कसली घाणेरडी विसर,—आपल्या देशाची, आपल्या कर्तव्याची, आपल्या बाणेदारपणाची, आपल्या थोरवीची, आपल्या कर्तृत्वशक्तीची व अखेर आपलेपणाची—कोठून, कशी आणि कां आली कळत नाहीं! पहिल्यासारखा रानटी व क्रूर काळ हल्लींचा नव्हे; समशेर आणि गर्दन यांची गांठ पडण्याचें कारण नाहीं, दुष्ट, मदोन्मत्त आणि अडदांड व लुटारू

राज्यकर्त्यांचा अम्मल नाहीं, विद्यादेवीचें साम्राज्य आहे; न्यायाची मशाल सर्वत्र पाजळते, " गुणा न ह्मणती उणा" असा प्रभु सुदैवानें लाधला पण करणार काय? आळशी, आइत खाऊ, अभिमानशून्य, कर्तव्यपराङ्मुख, कज्जेदलाल, दुराचारी, दुर्व्यसनी व भुकेबंगाल असे आह्मी कसे झालों ईश्वर जाणे! महाराष्ट्रनिबिडवनांतल्या मृगेंद्रांना ही मेषपात्रता आली तरी कोठून व कशी? हांजीहांजीपणा शिरला कसा? अभिमान, आपल्या मायदेशाचा आणि मायधर्माचा जिरला कोठें? त्यांच्या अंगांतली करामत नाहींशी झाली कशानें, कोणी फट ह्मणेल किंवा डोळा उघडून आमच्याकडे पाहीन ह्मणेल तर त्याची प्राज्ञा नव्हती आणि आतांच ही अवदसा कोठून कशी आली? भाषेची निंदा करा, तिला नाहीं नाहीं त्या खोड्या ठेवा, धर्माची टवाळकी करा, यथेच्छ निर्भर्त्सना करा; खावयाला अन्न मिळेना, सत्ता स्वतःच्या पदार्थांवर राहो बाजूला पण देहावरसुद्धां नाहीं, हवें त्यानें हवें तसें तोंडसुख घ्यावें, तुह्मी अमूक आणि तमूक ह्मणावें, तुह्मी अस्से तस्से अशी विटंबना मांडावी, तरी हूं कां चूं नाहीं, ते ह्मणतात तर त्याला द्या आपलाही एकसूर त्यांत मिळवून, इतपत ही नादानगिरी आली! काय करावें! आमच्यांतल्या चांगल्या वस्तूंची मुलाखत परदेशच्या परक्यांनीं करून द्यावी, आपल्या पूर्वजांची कीर्ति ऐकारे ह्मणून आर्क्थ नामक ऑग्लानें कंठशोष करावा. तुह्मीं दारू पिऊं नका, वाईटरे वाईट हें व्यसन, ह्मणून विलयतेंतून कंठरव ऐकण्याचा वखत यावा. आमचे—महाराष्ट्रकवि तुकोबा, ज्ञानदेवादि अमोलिक, अशी शिफारस ग्र्यांट साहेबांस करण्याचा प्रसंग यावा.- आमच्या स्त्रिया सुनीतिमान्, सुजाण, त्यांची इज्जत उंटावरल्या शाहण्यानें घेतली तर परभारें तिसराच विलायतकर त्यांचा

समाचार घेतो, तरी तें आह्मांस कळतही नाहीं; अशा एक का दोन ह्मणून रडकथा सांगावयाच्या आहेत? राज्य मिळविणें, मुलूख काबीज करणें, दुस्मनाचा सूड घेणें लूट घरीं आणणें, आपला दरारा बसविणें, या असल्या नकोत गोष्टी आतां आह्मांला; त्याची आठवण किंवा उठाठेव गतभर्तृकेनें कुंकवाची–सौभाग्याची–करणें यापैकींच तो बहुतेक प्रकार झाला आहे. पण देश, देशाभिमान, देशसेवा, ज्ञानप्रसार, नीतिवर्धन, धर्मसंरक्षण, समाजव्यवस्था, भाषाभिवृद्धि, उद्योगतत्परता इत्यादि बाबी तरी खऱ्या? रणांगणाचें दर्शन नको, क्रौर्याचा विटाळ नको, माणुसकीला काळोखी आणावयाला नको, रक्तपात नकोत, कांहींएक नको. दृढनिश्चय, कर्तव्यदक्षता, स्वाभिमान, विद्याव्यासंग, नीतिनैपुण्य आणि उद्योगपरायणता हीं तरी हवींतना? असो. अशा प्रकारचें चऱ्हाट वळत बसण्यानें विषयांतराचें पाप बोडक्यावर बसेल तें टाळलें पाहिजे.

इ० स० १७५४.

राघोबा, विठ्ठलराव वगैरे सरदार मंडळी हिंदुस्थानच्या मोहिमेवर दुसऱ्यानें निघाली. **अफगान** बादशाह **अबदाली** यानें मागें (इ० स० १७५३ सालीं) स्वारी करून दिल्लीबादशाहाला जेरीस आणलें आणि त्याचे **लाहोर, मुलतान** हे दोन सुभे घेऊन तह केला. त्याचा सूड घ्यावा आणि त्या कामीं मराठे उत्तम उपयोगी पडतील अशी दिल्लीकराची समजूत होती; आणि त्याप्रमाणें मला सहाय्य करा असें दादासाहेबांकडे बोलणें दिल्लीहून आलें. रोहिल्याचा सरदार **नजीब उद्दवला** अबदालीकडे फितला. त्याचाही सूड दिल्लीकरास घेणें होता. तेव्हां मराठ्यांस शरण जाणेंच भाग पडलें. राघोबाही असली सोन्यासारखी संधि व्यर्थ दवडतो थोडीच. हो ह्मणून आपलें घोडें तत्काळ त्यानें पुढें ढकलिलें. नजीब उद्दवला

आणि अवदालीचा सुभेदार **मीरशाबुद्दीन** यांस जेरीला आणण्याची कामगिरी राघोबानें विठ्ठलरावास सांगितली. धन्याचा हुकूम होण्याचा उशीर कीं उचलली अनीन आणि मारली घोड्याला टांच अशी तों विठ्ठलरावांची तयारी. पंजाबप्रांत, कडव्या धिप्पाड शरीराच्या रानटी व अर्बुद अशा जातीशीं गांठ, ह्मणून विठ्ठलरावांस कांहीं भीति शंका वाटावयाची होती? पण नाहीं; त्यांच्या शरीराला भीतीचा विटाळच कधीं झालेला नाहीं आणि झाला तर टिकणार किती वेळ? दक्षिणेंतल्या भीमथडी बुटक्या घोड्यांस **अटके**जवळ सिंधूनदीचें पाणी पाजविणें याजपेक्षां महत्कृत्य तें कोणतें उरलें? असो. राघोबाच्या सांगण्याप्रमाणें अबदालीचा सुभेदार आणि रोहिलखंडांतला प्रबळ राजा नजीबउद्दवला यांजवर विठ्ठलराव, आपल्या सैन्यानिशीं, पंजाबांत तुटून पडले. धिप्पाड शरीर, बळकट बांधा, राकट हाडें, क्रूर स्वभाव, धैर्याचे जसे पर्वत, आणि शौर्याचें बाळकडू लहानपणापासून मिळविलेलें, असे गिलची, अफगाण, रोहिले लोक आणि त्यांच्यावर;—दक्षिणेंतल्या खुज्या आकाराचे, सडपातळ, अभिमानास पेटून व दुःखानें गांजून क्षात्रधर्म स्वीकारलेले, दहींभातखाऊ, दाणीपणाचा कारभार चालविणाऱ्या कुळांत जन्मलेल्या, हिडीसपिडीस करून घेतल्यामुळें कंटाळलेल्या, उडाणटप्पू, पोंकळकाष्ट्या व घरबैठ्या ब्राह्मणभाईनें मराठ्यांच्या सैन्याचा पुढारीपणा घेऊन चाल करावी, त्यांचा पराभव करावा, त्यांस शरण आणावें, त्यांची खोडकी मोडावी, हें काय लहानसान आश्चर्य? ब्राह्मणानें अफगाण आणि रोहिले यांस हुसकून लावावें, त्यांस दांतीं तृण धरावयास भाग पाडावें; त्यांनीं अरे तह करतोंरे ह्मणून दांत विचकत यावें, याला ह्मणावयाचें तरी काय? आणि अशा तेजस्वी, पूर्णपराक्रमी, अतुलप्रतापी, शौर्यनिधि, रणधुरंधराचें कौतुक किती तरी मानलें पाहिजे!

पण नाहीं. आह्मीं महाराष्ट्रीय हल्लीं खरोखर अगदीं नादान आणि मूर्खशिरोमणि होऊन बसलों आहोंत. नाहींत आमच्या हातून आपल्या पूर्वजांच्या सारखीं कृत्यें होत तर राहिलें एके बाजूला; आपल्या वांट्यास तो काळ नाहीं, ती वेळ नाहीं, याला इलाज काय ? पण त्या तसल्या ( विशेषणें तरी कोणतीं व किती द्यावीं ) अपूर्व तेजस्वी कोहिनूर हिऱ्या सारख्या पुरुषश्रेष्ठांचें स्मरण, गुणवर्णन करावें तर खरें ! कीं ते त्यांचे रणप्रताप ऐकून भेदरण्याइतकी "सुधारणा" आमच्यांत झाली ह्मणून त्यांचें नांव ऐकतांच थरकांप सुटतो ? काय असेल तें असो; आमचे सध्यांचे महाराष्ट्रीय विवेकभ्रष्ट झाले हेंच खरें, त्यांना अक्काबाईनें पुरें घेरलें आहे. असें नसतें तर पूर्वजांच्या इतिहासाचें स्मरणसुद्धां त्यांस "पथ्य" कां होऊन बसतें ? आपल्या पूर्वजांची ओळख ते कां विसरते ? आपला अभिमान त्यांच्यांतला कां विगलित होता ? आपल्या मायभाषेची आणि मायधर्माची डोळे उघडून विटंबना चाललेली ते कसे बघत राहते ? इतकी कर्तव्यशून्यता, असला आळस, इतकें औदासीन्य कोठून त्यांच्या अंगात मुरतें ? दारिद्र्याची अशी कां दोस्ती जमती ? तर तें कांहीं नव्हे "बुद्धिः कर्मानुसारिणी" ! अस्तु.

या जवान पठ्ठ्या विठ्ठलरावानें नजीब उद्दवल्यास तोंड लपवून मरणाच्या भीतीनें पळून जावयास लाविलें आणि **मीर शाबुद्दीनास** दिल्लीला बादशहापुढें खेंचून आणिलें ! या ब्राह्मणभाईचें हें अपूर्व शौर्य पाहून साऱ्या दिल्लीदरबारानें आपलीं बोटें तोंडांत घातलीं. **"राजे उमदे तुल्मुलुख बहादर"** (ह्मणजे दौलतीचा खांब) ही किताबत मोठ्या थाटमाटानें भर दरबारांत बादशहानें **विठ्ठलरावांस** दिली. मोर्चेलें वारविण्याचा मान तुमचा आहे तो घ्या; आह्मी देतों, असें बादशहानें विठ्ठल-

रावांस ह्मटलें. पण माझे धनी सरकार पेशवे यांस सुद्धां तो मान नाहीं मग म्यां त्यांच्या किंकरानें कसा स्वीकारावा? अशी त्यांनीं विनंती केली. हरकत नाहीं, तो तुह्मी ध्याच आह्मीं तुह्मांस दिला आहे, त्याचा स्वीकार केला पाहिजे, असें बादशहानें ह्मटलें. तेव्हां निरुपायास्तव तीं घेतलीं आणि आपल्या डंक्यावर बांधलीं. स्वतः वापरलीं नाहींत! के, सी, आय, रावसाहेब, रावबहादुर सारख्या "कागदी" किताबतीस्तव हपापून प्रसंगविशेषीं हवी ती बहादुरी करणाऱ्या महाराष्ट्रियांनीं हें उदाहरण पक्के ध्यानांत ठेवावें. चार दिवसांच्या पोकळ शब्दगौरवासाठीं किंवा "सुरस व मनोवेधक" भाषणानें चार चौघांच्या पुढें नांव आणणाऱ्या हल्लींच्या वीरावतंसांत आणि त्या वेळच्या बहादुरींत किती अंतर तें उगीच पाहून ठेवावें. असें ह्मणून पुढला क्रम सांगण्यास सुरुवात करूं.

पुढें इतक्यांत अबदाली आणि त्याचा पंजाबांतला सुभेदार यांत वैमनस्य आलें. ही संधि राघोबानें साधली. विंचूरकर व होळकर यांस बरोबर घेऊन पंजाबावर मोहीम केली. त्यांत पूर्ण फत्ते मराठ्यांस मिळाली. पंजाबांत मोठा जय मिळविला, आणि त्या प्रांतावर संपूर्ण स्वामित्व स्थापन केलें तेव्हां पुनः दक्षिणेंत मराठे-लष्कर परत आलें.

दक्षिणेंत आल्यावर हैदराबादकराशीं युद्ध झालें. त्याला **तांदुळजाची लढाई** ह्मणतात. तेथें मराठ्यांस जय हा ठेवलाच होता.

पुढें थोड्याच दिवसांत **पानपतचें** भयंकर रणकंदन माजलें. सारी दक्खनच्या दक्खन—गिलच्यांचें पारिपत्य करावें, गिलची होता कीं नव्हता असें करावें, आसेतुहिमाचल मराठीराज्य व्हावें ह्मणून—निघाली. महाराष्ट्रभूंतले अडीच लाख शूरपट्ठे

डरक्या फोडीत गिलच्यांच्या नरडीचा केव्हां घोट घेऊं असें ह्मणत चालले. सदाशिवरावभाऊ त्यावेळीं सेनाधिपति होता. **विश्वास राव**, मराठ्यांचा युवराज त्यावेळीं आपली समशेर पाजळण्यासाठीं पुढें सरसावला. झाडून सारे सरदार हिंदुस्थानावर निघाले. त्यांतच आमचे उमदे तुल्मुलुख विठ्ठलराव विंचूरकरही होते. मराठ्यांच्या "सौभाग्याची गळसरी" या प्रसंगीं तुटावी असा ईश्वरीसंकेत होता! भाऊ साहेबांचा गर्वसागर खवळून त्यांतल्या लाटा इतस्तत: दाण्दाण् उसळूं लागल्या. ते कोणाचें कांहीं एक ऐकेनात. शिंदे, होळकर, विंचूरकर असे नेकजात व हरवक्त सरकारकामीं आलेले नौकर त्यांच्या संबंधानें भाऊ साहेबांच्या मनांत तुच्छ बुद्धि. **बळवंतराव गणपत** ह्मणून मोठ्या अकलेचे व महा दुष्टबुद्धीचे खंदक, यावेळीं भाऊ साहेबांस मंत्री मिळाले! शिंदे होळकरांची सल्ला भाऊ साहेबांस पसंत पडेना. करणार काय? दुर्दैव ओढवलेलें. खुद्द अबदाली तह करतों रे ह्मणून मराठ्यांस निरोप पाठवी. इतका त्याला सुद्धां मराठ्यांचा वचक बसलेला होता! पण ऐनवेळीं सर्व दगा जाहला. **कुंजपुऱ्यावर** हल्ला करून पांच सहा हजार पठाण मराठ्यांनीं जिवंत कापून काढले. **कुतुबशहा** अबदालीच्या नाकांतला केवळ बाल त्याला हत्तीवरून लोटिलें, मूत पाजा ह्मटलें आणि तोफेच्या तोंडीं देऊन उडविलें! असा कहर केला. त्यामुळें अबदालीच्या तळव्याची आग मस्तकास चढली, लढाईसाठीं तो तुटून पडला. मराठ्यांचें सैन्य अंमळ बेसावध होतें. तें एकाएकीं अबदालीला पाहून घाबरलें. पण त्यांच्या अंगांतला जोरच कांहीं विलक्षण. हां हां ह्मणतां ह्मणतां सांवरून त्यांनीं अबदालीशीं गांठ दिली. अबदालीचा पराभव जाहला. जीव घेऊन गिलचे पळत सुटले. खासा दुराणी अरे बाबा परतारे, हा पहा गनीम आमच्या सैन्यास

कापीत सुटला. जीव घेऊन कोणीकडे पळतां? आमचा देश आतां फार दूर राहिला. तेथवर धडपणें, हे मराठे कांहीं आह्मांस स्वदेशीं जाऊं देत नाहींत, एवी तेवी मरणार, मग रणांत कां मरानात! असें काकुळतीस येऊन तो आपल्या सैन्यास सांगूं लागला. त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं तेव्हां मागें परता नाहीं तर तुमची येथल्या येथें गर्दन उडवितों अशी अबदालीच्या वजीरानें समशेर बाहेर काढून सैन्यास दहशत घातली. शेंदोनशें आपले लोक त्यानें कापून काढले. तेव्हां पळत सुटलेलें गिलची सैन्य मराठ्यांवर परतलें. मराठ्यांची पुण्याई सरली. त्यांचा काळ ओढवला. पुनः गिलच्यांस हुसकून लावावें ह्मणून इर्षेनें हर[1] हर महादेवाची भयंकर गर्जना ठोकीत मराठे निकरानें तुटून पडूं लागले. नाना साहेबांचे चिरंजीव विश्वासराव, वय अवघें अठरा वर्षांचें, हातांत समशेर घेऊन लढाईंत भर मध्य ठिकाणीं उभे होते. मारा, तुडवा उडवा, बडवा ह्मणून एकसारखी आपल्या सैन्यास ईर्षा देत शत्रूवर चालले होते इतक्यांत शत्रूकडील एक गोळी त्यांच्या छातींत शिरली दुसरी कपाळावर बसली. तिसरा बाण खाकेंत घुसला

---

१ महाराष्ट्रभूचे पठ्ठे वाघ शिकारीवर झडप घालण्यासाठीं चवताळून जात तेव्हां "हर! हर!!" "हर हर महादेव" या शब्दोच्चाराच्या डरक्या फोडीत. पण दुर्दैवानें त्याच डरक्यांचा उपयोग "भोजनभाऊ" कोण भक्तिपुरःसर भोजनसमारंभ करतात हें पाहिलें ह्मणजे रणनवरे "भट" कसे "भट्ट" झाले ह्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. समरांगणांतला ईर्षावाज उद्गार भोजनसमारंभांत आनंदसूचक सुरुवातीचा होऊन बसला या बद्दल आनंद प्रदर्शन करीत राजभक्ति ओकणाऱ्या इतिहासकाराची अद्याप वाण भरून निघाली नाहीं. बाकी श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यावरील गंजलेल्या तोफा व त्याजवर पसरलेल्या वेली सध्याच्या शांतकाळाचें सौभाग्य सुचवितात असा तर्क मारिस साहेबानें काढला आहे.

तेव्हां हौद्यांत विश्वासराव धाडकन उताणे पडले! खवासखान्यांतल्या खिजमतगारानें हें लोकांस कळूं नये ह्मणून त्यांच्या अंगावर शेला टाकिला. जवळ शेजारींच पार्वतीबाई, सदाशिव रावाचें कुटुंब त्या रणामध्यें होतें. आपल्या पुतण्याचा शब्द मध्येंच कां थांबला ह्मणून तिनें चौकशी केली, तों रावसाहेब पडले असें तिला कळलें. जात बायकांचीच. तें वर्तमान ऐकून तेथें तिनें मोठा आकांत मांडला! ब्राह्मणांच्या बायका, त्यांत श्रीमंत पुण्यप्रतापी पेशव्यांच्या घरांतल्या कधीं उनांत गेल्याचें ठाऊक असण्याचा सुद्धां संभव नाहीं. पण नव्हे तो काळ निराळा, त्या वेळचीं माणसें निराळीं. नाहीं तर आपला मुलगा नाजुक आहे, वचकभर भात तीन वेळां जेवतो, भितरा भारी ह्मणून हल्लींच्या काळीं त्याच ब्राह्मणांच्या बायका आपल्या मुलांच्या फुशारक्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं मारीत बसतात. तशी त्यावेळीं स्थिति नव्हती, हें कां आतां निराळें सांगावयास हवें? असो. विश्वासराव पडल्याचें वर्तमान मराठ्यांच्या सैन्यांत तेव्हांच पसरलें. जिकडे तिकडे हाहाःकार जाहला. चिन्ह कांहीं चांगल्यांतलें नव्हे ह्मणून सर्व दचकले. भाऊसाहेबांची तर कंबरच खचली. त्यांना सर्व जग उदास वाटूं लागलें. पण तो मर्द गडी. काळास टक्करा देत बसण्याला कमी करणारा नव्हे. संतापून एकाएकी जास्त त्वेषानें भाऊसाहेब गिलच्यावर तुटून पडले. मराठ्यांची सरशी कांहीं होईना; विश्वासराव पडले ह्मणतांच सर्वांचे पाय गळले. गिलच्यांनीं पुढें पुढें चाल करून येण्याचें सुरू ठेविलें. मराठी सैन्याला दम धरवेना. तें माघार घेऊं लागलें. एकानें माघार घेतांच सर्व सैन्य पळत सुटलें. जो तो आपला प्राण वांचवावा ह्मणून पळताच पाय घेऊं लागला. मराठ्यांची कदीमपासूनची चाल कीं, केव्हां पळता पाय घ्यावा केव्हां

पळाल्यासारखें करावें, तशांतला प्रकार या खेपेस नव्हता. गाडून उभें राहवें असा भाऊंचा निश्चय. सैन्य पळूं लागतांच भाऊसाहेब घाबरले; अरे पळूं नका; कां घाबरतां, दक्षिणेंत जाऊन काय तोंड दाखवाल, विश्वासराव पडले, नानासाहेबांस काय सांगाल असें बहुत प्रकारें ओरडून सांगत; पण कोणी ऐकेना. जो तो पळत सुटलेला. पळूं लागलेलें सैन्य परत येण्यास दुसरा उपाय नाहीं असें पाहून जयसूचक वाद्यें शहाजणीं वाजवावयास उरल्या सैन्यास भाऊंनीं हुकूम दिला. तरी कोणी परतेनात. जो तो धूम पळ काढीत सुटलेला. मारा मारा ह्मणून भाऊसाहेब ओरडत. त्यांच्या तोंडास त्यामुळें खर सुद्धां आली. मग मानेनें, मारा मारा असें खुणाऊं लागले. **सोनाजी भापकर** भाऊसाहेबांच्या शेजारीं उभे होते ते सुद्धां पळूं लागले, सोनाजीबुवा, पळून जाऊं नका असे भाऊसाहेब ह्मणाले, तेव्हां पळालेले लोक परत आणतों असें निमित्त करून तेही निसटले ! भाऊसाहेब, चला समरांगण सोडून जाऊं, पुढें चांगला सूड घेतां येईल असें कित्येकांनीं भाऊंस पुष्कळ वेळां सांगितलें. पण तें त्यांच्या मनास येईना. एवढी फौज पण अवघी पन्नास मंडळी भाऊसाहेबांजवळ होती तितक्यानिशीं ते लढत होते. गिलच्याशीं गांठ. शिंदे, नजीबउद्दवला, विठ्ठल शिवदेव, आणि दमाजी गाईकवाड समशेरबहादूर या मंडळीनें भाऊसाहेबांची पाठ अखेरपर्यंत सोडिली नाहीं. अडीच लाख लोक भाऊसाहेबांनीं बरोबर आणिले होते. ऐन प्रसंगीं पन्नास लोक मात्र जवळ नंग्या समशेरी काढून लढत होते. खचीत भाऊसाहेबांचें कोण भयंकर तरी धैर्य हें ! मागें पाय घ्यावयाचा नाहीं हा निश्चय कायम तरी कोठपर्यंत ठेवावयाचा ? आणि त्याचप्रमाणें स्वामिसेवेंत अंतर पडावयाचें नाहीं, शत्रूला पाठ दाखवावयाची नाहीं, असा पण पार पाडण्यासाठीं वीस ह-

जार सैन्याशीं **पन्नास** लोकांनीं भांडत उभें राहावयाचें ह्मणजे हें आहे तरी काय? नाहीं; ती मंडळी "महाराष्ट्रभूचें पय:पान" केलेली इतरांची अशी प्राज्ञा नाहीं व्हावयाची हें खचीत. या रणकंदनांत प्रस्तुतच्या चरित्रनायकांस अखेरच्या गर्दीत महा भयंकर जखमा लागल्या. मस्तकावर एक समशेरीची जखम, छातींत बर्चीची आणि मांडीत बाणाची. आणखी पदरचें सर्व सैन्य झाडून एकुन एक, कांहीं पळालेलें व कांहीं ठार झालें. एकटा प्राणी विठ्ठलराव काय तो रणांगणीं होता. दुसरें कोणी नव्हतें. गिलच्यांनीं मराठ्यांची कापाकापी स्वस्थ चालविली. पानिपतची घोर रणभूमि रुधिरप्राशनानें यथेच्छ तृप्त झाली. तेव्हां आपल्या धन्याचें शव कोठें मिळतें कीं काय हें पाहवें व त्याचें सार्थक करावें ह्मणून दोघे विठ्ठलरावाचे इमानी नौकर त्या समरभूमींत फिरूं लागले. फिरण्यांत एक सबंध दिवस गेला. दुसरे दिवशीं निराश होऊन परत जाणार तों अकस्मात विठ्ठलरावाचें तोंड रक्तानें माखलेलें आसपास मुडद्याचे ढीग पडले आहेत, घारी गिधाडे आनंदानें लचके तोडताहेत अशा स्थितींत आढळलें, जवळ जाऊन निरखून पाहतात तों आपला धनी जिवंत आहे असें पाहून त्यांस मोठा आनंद झाला. आपल्या डोक्याचीं पागोटीं टराटर फाडून त्यांनीं अगोदर धन्याच्या जखमा बांधिल्या. पण खावयाला अन्न आणि पियावयाला पाणी त्या तशा स्थितींत विठ्ठलरावांस तीन दिवस मिळालें नाहीं! थोडेसे-फुटाणे खावयास देऊन पियावयास पाणीही दिलें आणि आपल्या धन्याला पाठीवर घेऊन विठ्ठलरावाचा हुजऱ्या **बाळाजी जगताप** त्या रणांतून बाहेर पडला! शिवशिव काळाची करणी खरोखर अगाध हां! विठ्ठलरावांवर कोण हा प्रसंग? पण याबद्दल वाईट वाटतें त्याजपेक्षां लक्षपट आनंद

किंवा ती त्यांची स्वामिसेवा, कर्तव्यदक्षता आणि शूरपणाची शर्थ पाहून कौतुक, वाटतें! असो. अशा सत्पुत्रांस आमची मायभू प्रसवली ह्मणून तर "यावच्चंद्रदिवाकरौ" तिची कीर्ति अबाधित राहिली आहे! हल्लींच्या काळीं तिच्या तोंडास काळोखी लावणारीं पोरें खंडोगणती निपजतात, तरी तिच्या कीर्तींत लवमात्र कमीपणा येत नाहीं, याचें कारण, शंभर वर्षांपूर्वी तिच्या सत्पुत्रांतली करामतच होय.

अशा प्रकारें विठ्ठलरावांस पाठीवर घेऊन कसेंतरी दक्षिणेंत त्यांच्या नौकरांनीं आणून पोंचविलें. तेथें आल्यानंतर त्यांच्या जखमा नीट झाल्या. हुषारी आली पण तो अपमान त्यांच्या मनांत डोचूं लागला. इतउत्तर समशेर हातांत धरावयाची नाहीं. तीर्थयात्रा करीत फिरावें वगैरे प्रकारचा व्यामोह, कुरुक्षेत्रांत युद्धसमयीं भारतीय वीरश्रेष्ठ अर्जुनास तसाच विठ्ठलरावास ही झाला. मजल दरमजल कुच करीत नानासाहेबांकडे विठ्ठलराव गेले आणि साष्टांगप्रणिपात करून बोलले; "बहुत पापी ह्मणून संकटें दुःखें प्राप्त जाहलीं असतांही वांचलों; ईश्वरीइच्छेस उपाय नाहीं; शेवटची प्रार्थना हीच कीं स्वामींनीं, तीर्थयात्रा करून स्वदेहाचें सार्थक करण्याची परवानगी द्यावी, असें बोलत असतां त्यांचे डोळ्यांत पाणी आलें. तेव्हां नानासाहेबांचाही गळा भरून आला. त्यांच्यानें फार बोलवेना. हातीं धरून जवळ बसवून घेतलें आणि विठ्ठलरावांस नानासाहेब ह्मझाले "तुह्मीं ऐसें कैसें बोलतां. शूर आहांत. शत्रूचा सूड घेतल्याशिवाय राहिल्यास स्वर्गी वडील काय ह्मणतील? शत्रूंस पुनः केव्हां तरी समशेर दाखवूं. असें अधीर न होणें." आणि अनेक प्रकारें विवेकाच्या गोष्टी सांगितल्या तेव्हां पुनः हातीं समशेर धरण्याचा निश्चय विठ्ठलरावांनीं कायम केला. पण पुढें

दुर्दैवानें नानासाहेब पेशवे, पुत्र व बंधुशोकानें आणि पानपतच्या अपमानामुळें वारले. त्यांच्या पश्चात् पेशवाईचीं वस्त्रें वडील चिरंजीव **माधवराव** यांस मिळालीं. माधवरावांची कारकीर्द ह्मणजे आह्मां मराठ्यांच्या प्रतापदिनकराचा अगदीं मध्यान्हसमय. खरोखर माधवराव पेशव्यासारखा शूर, परमन्यायी व राज्यकार्यदक्ष आणि रणधुरंधर पेशवा दुसरा झालाच नाहीं. आणखी त्याचप्रमाणें आमचें नशीब सवाई शिकंदर. ह्मणून याच माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत नरश्रेष्ठ महाराष्ट्री यांनीं, आपल्या अपूर्व कर्तबगारीनें, उठवलेल्या हिंदुपदपातशाहीच्या टोलेजंग इमारतीमध्यें, ग्रहकलहाग्नीनें आपलें प्रस्थान ठेवून दिलें. तो सर्वभक्षकअग्नि हळू हळू धुमसूं लागला पण माधवरावासारखा धूर्त, चाणाक्ष व बाणेदार पेशवा होता ह्मणून त्या अग्नीलाही आपलें उग्र स्वरूप दाखतां येईना. मधून मधून ठिणग्या उडत पण त्या दाबून टाकण्यास माधवराव सदा तत्पर असत. प्रस्तुतचे चरित्रनायक विठ्ठल शिवदेव, यांना या कलहाग्नीच्या ठिणग्या बऱ्याच मधून मधून लागत. त्याचा सर्व वृत्तांत यथानुक्रम पुढें येतच आहे.

श्रीमंत नानासाहेब कैलासवासी झाले आणि पेशवाईचीं वस्त्रें माधवरावांस मिळालीं तेव्हां राघोबाकडे सर्व कारभार असे. कारण पेशवे अल्पवयस्क होते. हिंदुस्थानांतला पेशव्यांचा वचक सर्व उडून गेला. पानपतच्या लढाईंत मराठ्यांची दाणादाण झालेली त्यांनीं पाहिली, तेव्हां पूर्ववत् प्रमाणें खंडण्या वगैरे देण्याचें हिंदुस्थानच्या किरकोळ राजांनीं नाकारलें. जो तो पेशव्यांचा मुलूख जास्त जास्त बळकावूं लागला. त्यांना वाटलें मराठे कांहीं पुनः नर्मदा उतरून इकडे यावयाचे नाहींत. त्यांनीं हाय घेतली, त्यांचा बहुतेक निःपात झाल्यासारखा आहे. आणि इ-

कडे दक्षिणेंतून हिंदुस्थानाकडे जाण्याची छातीही कोणाला होईना. खुद्द राघोबानें जावें तर इकडे दक्षिणेंत निजामासही वाटे कीं मराठे बुडविण्याची ही संधि उत्तम आहे. ते आतां खचीत गाय झाले; आपल्या मुठींत येतील. तेव्हां इकडे असे मनसुबे टाकून हिंदुस्थानांत जाणें राघोबास बरें वाटेना. शिवाय खालीं पायथ्याशीं कर्नाटकांत पेशव्यांबरोबर हुजत घालण्यास हैदरअल्ली तयार असेच. ह्मणजे हा काळ असा मराठ्यांस चोहोंकडून मोठ्या अडचणीचा आला. मातबर मातबर सरदार सर्व पानिपतांत ठार झाले. पोक्त मसलतीचें कोणी उरलें नाहीं. आणि असें चोहोंकडून काहूर उठलेलें. 'मी खाऊं कीं तूं खाऊं' करीत पश्चिमेस निजाम, उत्तरेस हिंदुस्थानचे छपन्न राजे आणि दक्षिणेला हैदर, ही अशी मंडळी टपून बसलेली. चोहोंकडून अशा प्रकारें कोंडल्यासारखें मराठ्यांस झालें. त्यांतून निभाव लागणें किती कठिण हें ज्याचें त्यानें कल्पनेनेंच ताडावें. हीं इतकी बाहेरलीं खेकटीं. शिवाय घरचीं तीं निराळींच. सातारकर, कोल्हापुरकर मूळमालिक, पेशव्यांच्या शिरजोरपणाचें प्रायश्चित्त देण्याला आज ही संधि आहे ह्मणून टपत बसलेले. ह्मणजे सारांश हा काळ फार भयंकर व आणीबाणीचा. यांतून निभाव लागावा अशांतला कांहीं प्रकार नव्हता. सर्व राष्ट्रच्या राष्ट्र ठार बुडून रसातळास जावयाची ती वेळ होती. पण नाहीं, मराठे मोठ्या अपूर्व करामतीचीं माणसें. त्यांच्यावर आकाश कडाडून कोसळलें किंवा खाऊं कीं गिळूं ह्मणून कृतांतकाळ चालून आला तरी तिळभर सुद्धां न डगमगतां त्यांतून आपला बचाव करून घेण्याचें शरीराचें व बुद्धीचें विलक्षण सामर्थ्य त्यांच्यात असे. असला प्रसंग कठिण आलेला पण त्यांतून आमचे मराठे ह्मणूनच नुसते पार पडले, आणि उलट पुनः त्यांनीं आपला दबदबा यथापूर्व एवढेंच नव्हे तर त्याजपेक्षां कां-

कणभर जास्त सर्वांवर सारखा बसविला तो प्रकार कसा काय हें आपोआप आतां कळून येईल.

हिंदुस्थानांतली घडी विघडली, ती दुरुस्त करण्याची दुसऱ्या कोणांत हिम्मत नाहीं, हें पाहून राजे बहादर विठ्ठलशिवदेव यांस हिंदुस्थानांत रवाना करण्याचें ठरलें. शिंदे वगैरेंस तिकडे जाण्याची छाती होईना. इतकी दहशत बसलेली. पण विठ्ठलराव ह्मणजे काय धन्याची आज्ञा सुटली कीं पुरे साक्षात् यमधर्मावर तुटून पडावयास मागें पुढें पहावयाचे नाहींत. राघोबानें तुह्मीं हिंदुस्थानांत जा असें सांगतांच समशेर चमकावीत विठ्ठलराव तिकडे निघाले. त्या वेळींचा प्रसंग कसा होता हें कल्पनेनें सुद्धां सुरेख ताडतां येण्याजोगें आहे. राघोबानें विठ्ठलरावांस पत्र लिहलें. त्यांतील कांहीं वाक्यें उतरून घेतों. ह्मणजे तो प्रसंग चांगला ध्यानांत येईल. " प्रस्तुत नवा प्रांत साधावा ती गोष्ट होणें कळतच आहे. कदीम जागें राखिलें ह्मणजे त्यांतच बहूत आहे.××××—सांप्रतचा काळ विलक्षण आहे याजमुळें मनसुबा साधणें कठिण दिसतें असो; होणें तें होतच आहे. आपण पुरुष; प्रयत्नांस चुकूं नये. सर्व मुखत्यारी सांप्रत तुह्मांवर आहे. किल्ले राखिले ह्मणजे तुह्मीं फार केलें " हीं वाक्यें राघोबाच्या स्वदस्तूरच्या पत्रांतलीं आहेत. यावरून स्वतःला दम किती होता हें चांगलें कळतें. परंतु विठ्ठल शिवदेव ह्मणजे अपूर्व करामतीचा खंदा शूर व पटाईत कारस्थानी पुरुष. त्यानें वर्षभर आपला दरारा पूर्ववत् हिंदुस्थानभर बसविला. कोठें हूं कां चूं नाहीं. खंडण्यावगैरे सुरळीत येऊं लागल्या. मराठे दक्षिणेंत अद्याप प्रबळ आहेत अशी सर्वांची खातरजमा एकट्या विठ्ठलरावानें केली. न जाणो कदाचित् पानपतच्या कत्तलीचा सुरेख सूडही विठ्ठलरावानें घेतला असता; पण हिंदुपद-

पातशाहीच्या तख्ताखालींच कलहाग्नि पेटला होता, त्यानें आपलें डोकें वर उचललें. त्यासरशीं सर्व मसलती जेथल्या तेथेंच टाकून विठ्ठलरावाला दक्षिणेंत यावें लागलें ! येथें काय करावयाचें आहे ?

राघोबाचें व माधवरावाचें पटेना. राघोबास कैद केल्याशिवाय निर्वाह नाहीं; असा प्रसंग येऊन ठेपला. तेव्हां आपला टेंभा मिरवून पेशव्याची **मसनद** मिळवावी, मग त्याखातर काय झालें तरी पतकरिलें. असा विचार राघोबाच्या डोक्यांत शिरला. पुणें सोडून राघोबा व त्याचे दोस्तनौकर विंचुराकडे निघून गेले. हैदराबादकर नबाब पेशव्यांचा कदीम शत्रु; त्यांनीं कैकवेळां त्याची खोडकी मोडून केवळ हातांतलें बाहुलें त्याला केलें होतें. पण तें कांहीं नाहीं, त्याच्या सल्ल्यानें पेशवाई मिळवावी, हा राघोबाचा आणि त्याच्या सखारामबापूसारख्या सबंध शहाण्या मंत्र्याचा सल्ला ! पन्नास लाख रुपयांचा मुलुख देतों, मला सहाय्य करून माधवरावाची पेशवाई बुडवा. हें राघोबानें निजामाकडे बोलणें लाविलें. शाबास त्या राघोबाच्या महत्वाकांक्षेची, आणि सखारामबापूच्या स्वामिसेवापरायणतेची ! निजाम काय हातांत तिळांजुळी घेऊन उभा राहिलेलाच. त्यानें राघोबाचा पक्ष तेव्हांच उचलिला. विठ्ठलराव राघोबाच्या दिमतीखालीं फार दिवसांपासून होते. राघोबा ह्मणजे खासा मर्द अशी त्यांची खात्री जाहलेली. आणखी पेशवे घराण्यांतला वडीलपणा काय तो राघोबाकडे, यामुळें त्याची आज्ञा शिरसावंद्य करणें विठ्ठलरावाचें काम होतें. इकडेही अशी धांदल उडून राहिली तें पाहतांच राघोबानें हिंदुस्थानांत विठ्ठलरावास पत्र लिहिलें कीं, देखत हुकूम हुजूर निघून येणें. त्याप्रमाणें हिंदुस्थानचे सारे मनसुबे तेथल्या तेथें टाकून विठ्ठलराव मजल दरमजल कुच करीत पुण्यास येऊन दा-

खल झाले. येतांच त्यांनीं श्रीमंत सरकार माधवरावांची भेट घेतली. त्यावेळीं दरबारची सर्व मंडळी बदललेली. त्रिंबकराव मामा पेठे मुख्य कारभारी; गोपाळराव पटवर्धन नायब दिवाण; बाळाजीपंत भानू (प्रख्यात कपटनाटकी सूत्रधार नाना फडणीस) फडणीस; हरिपंत फडके लष्करी कामदार; अशी कांहीं व्यवस्था झाली होती. त्या सर्वांची खात्री कीं, विठ्ठल शिवदेव हे राघोबाच्या पक्षाचे; हे तूर्तच्या काळीं मोठे मातबर सरदार. फार पुरातन काळापासून एकंदर राज्याच्या त्यांनीं घडामोडी पाहिलेल्या. तेव्हां त्यास कैद करणें अत्यावश्यक असें सर्व दरबारचें मत पडलें. ती गुणगुण त्यांना कळली मात्र कीं, लगेच आपल्या गांवाकडे विठ्ठलराव निघाले. तेथें राघोबा व त्यांचे मसलतगार होतेच. त्यांनीं विठ्ठलरावांस आपल्या पक्षाकडे घेतलें. लढाई करून माधवरावाची खोडकी मोडावी हा बेत ठरला. पण अगोदर कलमबंदी करार करून दिल्याशिवाय आपल्या मसलतींत येणें होत नाहीं, असा विठ्ठलरावांचा रोकडा जबाब. त्याप्रमाणें राघोबानें कलमबंदी करार करून दिला. सर्वांनीं सैन्य जमा करून माधवराव पेशव्यांवर स्वारी केली. उभय सैन्यांची गांठ पडली. राघोबाच्या सैन्याची सरशी होऊन माधवरावांच्या पक्षाचा मोड होण्याचा प्रसंग आला. आपणाला जयप्राप्ति होत नाहीं असें पाहतांच राघोबाकडे माधवराव चालून गेले, आणि "काका हें काय? हा कलहाग्नि चांगलें करावयाचा नाहीं; तुमची इच्छा असल्यास मी आपल्या स्वाधीन राहतों, आपण कारभार करा आणि गादी शाबूत राखा ह्मणजे जाहलें." अशा प्रकारचें त्यांनीं भाषण केलें. तें ऐकून राघोबा गहिवरला. त्यानें आपसांतला तंटा मोडून टाकिला. पण यामुळें माधवरावाचे व राघोबाचे लोक बिथरले. कारण, माधवरावाच्या तर्फेनें राघोबावर त्यांनीं

शस्त्र धरिलें आणि राघोबाच्या तर्फेनें माधवरावांशीं त्यांनीं वैमनस्य मांडिलें व शेवटीं उभयतां एकत्र झाले ! ही संधि हैदराबादकर नवाबानें साधली. सर्व सरदारांस फितूर केलें, पुण्यावर चाल करून तें जाळून लुटून फस्त करण्याला सुद्धां मागेंपुढें पाहिलें नाहीं ! पुढें हैदराबादकर नवाब व पेशवे यांत युद्ध होऊन यथापूर्व पेशव्यांचा पुण्यप्रताप झळकूं लागला.

इ० स० १७६४.

माधवराव पेशव्यांनीं कर्नाटकावर जातीनें हजर राहून मोहिम केली. त्यावेळीं विठ्ठल शिवदेवही बरोबर होतेच. पण ते माधवरावांच्या मनांतून उतरले; त्यांजवर माधवरावाची इतराजी असे. इतक्यांत एकेदिवशीं विठ्ठलरावांच्या लोकांनीं पेशव्यांच्या हुजूर पागेंतल्या लोकांबरोबर कुरापत काढिली; तंटे झाले. ती वर्दळ माधवरावाच्या कानांवर गेली. माधवराव फार तापट व मोठ्या जरबेचा मनुष्य. त्यानें हें ऐकतांच "विठ्ठलराव कोण मगरूर आहेत हे. त्यांचा हरवक्त आपणांस त्रास होतो. यास्तव त्यांस कैद करून आणा व त्यांचा गोट लुटून फस्त करा" असा हुकूम एकदम सोडिला. तें वर्तमान विठ्ठलरावांस कळतांच "अब्रुरक्षणाकरितां तरवार करून कत्तल होऊन जाणें बेहत्तर" असा निश्चय त्यांनीं कायम केला. आणि लगेच पांच हजार लोकांनिशीं विठ्ठलराव समशेरी चमकावीत पेशवे सरकारांकडून कैद करावयास येणाऱ्या लोकांची वाट पहात उभे राहिले. तों हें वर्तमान मल्हारराव होळकरांस कळलें मात्र कीं, लगेच माधवरावाकडे जाऊन "विठ्ठल शिवदेव हे पुरातन नौकर, मोठे मर्द माणूस, यांजविषयीं ही विपरीत बुद्धि आपण कां धरिली ? त्यांचे पांच हजार लोक नाहींसे होण्यास आपल्या फौजेंतील दहा हजार लोक बळी पडले पाहिजेत. पंधरा हजार लोकांची आ-

पुढें कर्नाटकाच्या मोहिमेंत विठ्ठलरावांनीं आपली करामत माधवरावास दाखविली आणि त्यांच्या कडून " शाबास " ह्मणवून घेतलें तर त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. सिंहच तो, त्यानें प्रताप गाजविले, डरकीसरशीं सर्वांस भेदरून सोडिलें तर त्यांत नवल तें कोणतें ? असो. कर्नाटकची मोहीम फत्ते झाली. सर्व लष्कर पुण्यास परतलें. पानपतचा सूड घ्यावा ही माधवरावाची रात्रंदिवसाची प्रबल इच्छा असे. राघोबा, विठ्ठल शिवदेव हे उभयतांच हें काम करूं जाणेत, अशी माधवरावाची खात्री होती. त्याप्रमाणानें अगोदर विठ्ठलरावजीची त्यांनीं रवानगी केली. मुलुखामागून मुलुख सर करीत विठ्ठलराव चालले. या खेपीं विठ्ठलरावांवर माधवरावांनीं केवढी भिस्त ठेविली होती हें त्यांच्या एका पत्रावरून स्पष्ट होतें. श्री. माधवरावांनीं एका पत्रीं लिहलें कीं "तुह्मी हिंदुस्थानाचे, अमीराचे व सार्वभौमाचे मनसुब यांसमाहीत. तिकडील मनसुबे तुमचे हातें जाहले व पुढेंही उमदे उमदे मनसुबे करून हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा " इ. इ. गोहदच्या राण्यावर लगट करून विठ्ठलराव बसले होते. तों इतक्यांत मल्हारराव होळकर स्वर्गवासी झाल्याचें वर्तमान कळलें. सर्वांस फार वाईट वाटलें. खंडणीवर काम आटोपून हल्ला उठविला आणि राघोबा दक्षिणेंत परतले. विठ्ठल शिवदेव बंदोबस्ताकरितां हिंदुस्थानांत राहिले. मल्हारराव, विंचुरकराचे प्राणप्रिय दोस्त. त्यांचा अंत झाला हें ऐकल्यापासून विठ्ठलराव फार खिन्न झाले. त्यांची उमेदच गळाली. त्यांची उल्हासवृत्ति ह्मणतात पुढें कधींच कोणाच्या दृष्टीस पडली नाहीं. अशा खालीं एक दोन महिने गेले तों स्वतः विठ्ठलरावांची प्रकृति बिघडली. आपलें हें दुखणें शेवटचें असें त्यांच्या मनानें घेतलें. अखेरीचे दिवस मुलामाणसांत आणि कुलस्वामीच्या सेवेंत घालावे ह्मणून

शस्त्र धरिलें आणि राघोबाच्या तर्फेनें माधवरावांशीं त्यांनीं वैमनस्य मांडिलें व शेवटीं उभयतां एकत्र झाले ! ही संधि हैदराबादकर नबाबानें साधली. सर्व सरदारांस फितूर केलें, पुण्यावर चाल करून तें जाळून लुटून फस्त करण्याला सुद्धां मागेंपुढें पाहिलें नाहीं ! पुढें हैदराबादकर नबाब व पेशवे यांत युद्ध होऊन यथापूर्व पेशव्यांचा पुण्यप्रताप झळकूं लागला.

इ० स० १७६४.

माधवराव पेशव्यांनीं कर्नाटकावर जातीनें हजर राहून मोहिम केली. त्यावेळीं विठ्ठल शिवदेवही बरोबर होतेच. पण ते माधवरावांच्या मनांतून उतरले; त्यांजवर माधवरावाची इतराजी असे. इतक्यांत एकेदिवशीं विठ्ठलरावांच्या लोकांनीं पेशव्यांच्या हुजूर पागेंतल्या लोकांबरोबर कुरापत काढिली; तंटे झाले. ती वर्दळ माधवरावाच्या कानांवर गेली. माधवराव फार तापट व मोठ्या जरबेचा मनुष्य. त्यानें हें ऐकतांच " विठ्ठलराव कोण मगरूर आहेत हे. त्यांचा हरवक्त आपणांस त्रास होतो. यास्तव त्यांस कैद करून आणा व त्यांचा गोट लुटून फस्त करा " असा हुकूम एकदम सोडिला. तें वर्तमान विठ्ठलरावांस कळतांच " अब्रुरक्षणाकरितां तरवार करून कत्तल होऊन जाणें बेहत्तर " असा निश्चय त्यांनीं कायम केला. आणि लगेच पांच हजार लोकांनिशीं विठ्ठलराव समशेरी चमकावीत पेशवे सरकारांकडून कैद करावयास येणाऱ्या लोकांची वाट पहात उभे राहिले. तों हें वर्तमान मल्हारराव होळकरांस कळलें मात्र कीं, लेगेच माधवरावाकडे जाऊन " विठ्ठल शिवदेव हे पुरातन नौकर, मोठे मर्द माणूस, यांजविषयीं ही विपरीत बुद्धि आपण कां धरिली ? त्यांचे पांच हजार लोक नाहींसे होण्यास आपल्या फौजेंतील दहा हजार लोक बळी पडले पाहिजेत. पंधरा हजार लोकांची आ-

पुढें कर्नाटकाच्या मोहिमेंत विठ्ठलरावांनीं आपली करामत माधवरावास दाखविली आणि त्यांच्या कडून " शाबास " ह्मणवून घेतलें तर त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. सिंहच तो, त्यानें प्रताप गाजविले, डरकीसरशीं सर्वांस भेदरून सोडिलें तर त्यांत नवल तें कोणतें ? असो. कर्नाटकची मोहीम फत्ते झाली. सर्व लष्कर पुण्यास परतलें. पानपतचा सूड घ्यावा ही माधवरावाची रात्रंदिवसाची प्रबल इच्छा असे. राघोबा, विठ्ठल शिवदेव हे उभयतांच हें काम करूं जाणेत, अशी माधवरावाची खात्री होती. त्याप्रमाणानें अगोदर विठ्ठलरावजीची त्यांनीं रवानगी केली. मुलखामागून मुलुख सर करीत विठ्ठलराव चालले. या खेपीं विठ्ठलरावांवर माधवरावांनीं केवढी भिस्त ठेविली होती हें त्यांच्या एका पत्रावरून स्पष्ट होतें. श्री. माधवरावांनीं एका पत्रीं लिहलें कीं "तुह्मी हिंदुस्थानाचे, अमीराचे व सार्वभौमाचे मनसुबे यांसमाहीत. तिकडील मनसुबे तुमचे हातें जाहले व पुढेंही उमदे उमदे मनसुबे करून हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा " इ. इ. गोहदच्या राण्यावर लगट करून विठ्ठलराव बसले होते. तों इतक्यांत मल्हारराव होळकर स्वर्गवासी झाल्याचें वर्तमान कळलें. सर्वांस फार वाईट वाटलें. खंडणीवर काम आटोपून हल्ला उठविला आणि राघोबा दक्षिणेंत परतले. विठ्ठल शिवदेव बंदोबस्ताकरितां हिंदुस्थानांत राहिले. मल्हारराव, विंचुरकराचे प्राणप्रिय दोस्त. त्यांचा अंत झाला हें ऐकल्यापासून विठ्ठलराव फारच खिन्न झाले. त्यांची उमेदच गळाली. त्यांची उल्हासवृत्ति ह्मणतात पुढें कधींच कोणाच्या दृष्टीस पडली नाहीं. अशा खालीं एक दोन महिने गेले तों स्वतः विठ्ठलरावांची प्रकृति बिघडली. आपलें हें दुखणें शेवटचें असें त्यांच्या मनानें घेतलें. अखेरीचे दिवस मुलामाणसांत आणि कुलस्वामीच्या सेवेंत घालवे ह्मणून

हुति पडेल तेव्हांच विठ्ठल शिवदेव स्वाधीन झाले तर होतील. त्यांतून अशा जवानमर्द पुरुषांचा आपणांस कंटाळाच आला असेल तर त्यांस एखाद्या मोहिमेवर पाठवावें" अशी मल्हाररावानें रदबदली केली. ती माधवरावास पसंतही पण पडली. मल्हाररावानें माधवरावाकडे भेटावयास विठ्ठलरावास आणून उभयतांचीं मनें साफ होतील असा योगायोग आणिला यावरून एक गोष्ट चांगली सिद्ध होते कीं, स्वराज्य असलें ह्मणजे गुणांचें चीज उत्तम झाल्याशिवाय रहात नाहीं. विठ्ठलरावानें समशेर चमकावीत खुद्द धन्याच्या सैन्यावर चालून जाण्याची तयारी केली आणि त्याचें बक्षीस बहाल मर्जी हें मिळतें. खटावकर **कृष्णाजीपंतानें** बंड केलें तर शूर पुरुष, सरकार कामीं उपयोगी पडेल ह्मणून त्याला शाहूराजा खुष होऊन जाहगीर देतो, आपल्या नौकरींत घेतो. धनी हुरमत घेतो ह्मणून तरवार उपसणारा विठ्ठलराव, माधवरावास प्यार वाटतो. आह्मीं काय धन्याचे नौकर, सांगितल्या हुकूमाचे ताबेदार, हुकूम कीं राघोबाचें सुद्धां शिर उडवून आपल्या पायाजवळ पडेल असें करितों ह्मणणारा पटवर्धन सरदार पण या त्यांच्या अडदांडपणाचें प्रायश्चित्त काय तर बक्षीस, मेहरबानी हें. आणि आमच्या सार्वभौम प्रभु इंग्रजांच्या कारकीर्दींत अकुतोभय राज्य असतांना दंगेधोपे माजवून कशाला दाद न देतां आपली कर्तबगारी दाखविणाऱ्या तंट्याभिल्लासारख्या शूर उदार बंडखोरास देहांतशिक्षा हलकट खुन्याप्रमाणें मिळते. पुराणप्रसिद्ध मणिपूरसंस्थानांत सेनापति क्षात्रतेज चमकवितो तर त्याला त्याच्या राजकुळाची वगैरे मुरवत न धरितां फांशी देण्यांत येतें! तेव्हां सारांश इतकाच कीं विठ्ठलरावाच्या या अडदांड बाणेदारपणाबद्दल माधवरावाला मोठें कौतुक वाटलें आणि त्याची मर्जी बहाल झाली.

हिंदुस्थानांतले सर्व मनसुबे तसेच टाकिले आणि विंचुराकडे वि-ठलराव यावयास निघाले.

संपलें; इतकावेळ या रणधुरंधर, अपूर्व क्षात्रतेजस्वी ब्राह्मणभाईचें शौर्यधैर्यादिकांचें वर्णन करीत असतां, आनंदसागरास भरती येऊन तो फार उचंबळत असे. पण नाहीं, इतउत्तर दुःखाचा कडेलोट व्हावयाचा आहे. सासवड मुक्कामच्या एका गरीब घराण्यांतल्या कुटुंबांत पोसावयास जड झालेल्या अजागळ ब्राह्मणपुत्रास कोंकण, हिंदुस्थान, गुजरात, कर्नाटक, पंजाब, लाहोर वगैरे ठिकाणच्या रणकंदनांत नंगीसमशेर चमकावीत पुढें धांवत असतांना आह्मीं पाहिलें. शुद्ध मेंढवाड्यांत जन्मलेल्या व वागलेल्या आईत खाऊ व अन्नास महाग झालेल्या मेंढरानें एकाएकीं उग्र सिंहाचें स्वरूप धारण करून सर्व श्वापदांस आपापलीं तोंडें मातींत खुपसावयाला दशदिशा पळून लाविलें; त्याच्या आरोळीसरशीं मी मी ह्मणणारांची गाळण होई; त्याचा वचक सर्वांस थरकाप उत्पन्न करी; त्याचा निश्चय पाहून विधिघटना करणारास पंचाईत पडे. पण आतां ती वेळ वदलली, या नरश्रेष्ठ विठ्ठलरावाच्या नरडीचा घोट घ्यावा ह्मणून काळ टपत बसला. पुष्कळ शूर पठ्यांना विठ्ठलराव कर्दमकाळ असे पण स्वतःच्या काळापुढें त्याचें कांहींएक चालेना. दीन गाय होऊन अंथरुणास खिळला. तेव्हां सर्वभक्षक, महादुष्ट, पराकाष्ठेचा अविवेकी व सारासारविचारशून्य अशा खादाड मृत्यूनें आपला जबडा आ करून विठ्ठलरावास श्रावण वद्य प्रतिपदा शके सोळाशें एकोणणवद रोजीं गट्ट केलें! पेश-

…ा. १६६७.

अगदीं अवलीपासून सारख्या मालकांच्या चार पिढ्या स्वामिसेवेंत तत्पर असणारा महान् तेजस्वी हिरा आपल्या …ांचे डोळे दिपवीत होता. तो एकाएकी अस्तंगत

झाला. मराठ्यांतल्या साडेतीन शाहण्यांपैकीं एकटा सखाराम-बापू ह्मणत असे त्याप्रमाणें पुण्यप्रतापी पेशव्यांचे शिंदे, होळकर, विंचुरकर, व पटवर्धन हे चार हात. त्यांतला एक गळून पड-तांच दुसरा विंचुरकर हाही गेला ! असो काळाची करणी अ-गाध; परमेश्वराची इच्छा कोणांस मोडतां यावयाची नाहीं; ह्म-णून थोडक्यांत एकाच वाक्यांत ह्मणावयाचें ह्मणजे **राजेबहा-दर उमदे तुल्मुलुख विठ्ठल शिवदेव** महाराष्ट्रभूच्या मंग-ळसूत्रांतला एक मणी आणि तो 'आतां मसणांत पडला' हें दुःख फार मोठें आहे. त्यामुळें जास्त लिहवत नाहीं. यास्तव वाचकांची येथेंच रजा घ्यावी आणि विचार करून पहा तुमचे पूर्वज कसे होते, त्यांच्यांतही करामत कशानें आली, त्यांनीं आपलें नांव कसें गाजविलें आणि तुह्मींच कसे आतां इतके आळसी, अगदी गचाळ व कर्तृत्वशून्य झालां. ते, एवढी विनंति करावयाची !

'धनुर्धारी'

रा० गाडगीळ यांचा विंचुरकर घराण्याचा इतिहास फार उपयोगी पडला सबब त्यांचे पुष्कळ आभार मानतों.

---